# महाराष्ट्र शासन, वित्त विभाग

राज्य वेतन सुधारणा
समिती, २०१७

## अहवाल खंड-१

श्री. के. पी. बक्षी
अध्यक्ष
श्री. सीताराम कुंटे
सदस्य
श्री. राजीवकुमार मित्तल
सदस्य

मुंबई

# महाराष्ट्र शासन, वित्त विभाग

# राज्य वेतन सुधारणा समिती,
# २०१७

श्री. के. पी. बक्षी
अध्यक्ष
सेवानिवृत्त अप्पर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
श्री. सीताराम कुंटे
अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग
श्री. राजीवकुमार मित्तल
सचिव (व्यय), वित्त विभाग

**मुंबई**

# राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७

वित्त विभाग शासन निर्णय क्र. वेपुर-१२१६/प्र.क्र.५८/सेवा-९, दिनांक १७ जानेवारी, २०१७ राज्य वेतन सुधारणा समितीची स्थापना करण्यात आली होती आणि त्यानंतर शासन निर्णय क्र. वेपुर-१२१६ / प्र.क्र.५८ / सेवा-९, दिनांक १७ जुलै, २०१७ अन्वये समितीची कार्यकक्षा निश्चित करण्यात आली होती. राज्य वेतन सुधारणा समितीच्या https://www.mahaseventhpay.in या वेब पोर्टलवर नोंदविलेल्या ऑनलाईन मागण्या तसेच समिती व वित्त विभागाकडे प्राप्त लेखी निवेदने (ऑफलाईन) विचारात घेतल्या आहेत.

समितीकडे प्राप्त मागण्यांची संख्या आणि वेतनवृध्दीसंदर्भातील मागण्यांचे स्वरूप पाहता याबाबतच्या तपासणीसाठी अजून काही कालावधी अपेक्षित आहे. तसेच ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारसीनुसार केंद्र शासनाने विहित केलेल्या वेतन निश्चितीच्या २.५७ या सुत्रानुसार वेतन अदा करण्याची शासनाची प्राथमिकता विचारात घेऊन समितीने आपला अहवाल २ खंडात सादर करण्याचा निर्णय घेतला असून प्रथमत: समिती दिनांक ५ डिसेंबर, २०१८ रोजी महाराष्ट्र शासनास अहवाल खंड - १ सादर करीत आहे.

के.पी. बक्षी
(अध्यक्ष)

सीताराम कुंटे
(सदस्य)

राजीवकुमार मित्तल
(सदस्य)

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | | खंड-१ | |
| १ | प्रकरण क्रमांक १ - | प्रस्तावना | १ |
| २ | प्रकरण क्रमांक २ - | केंद्रीय ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशींचा सारांश | ६ |
| ३ | प्रकरण क्रमांक ३ - | राज्याची आर्थिक स्थिती - दृष्टीक्षेप | ११ |
| ४ | प्रकरण क्रमांक४ - | राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या सुधारित वेतनश्रेण्यांबाबत शिफारशी | २१ |
| ५ | प्रकरण क्रमांक ५ - | सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना | ४६ |
| ६ | प्रकरण क्रमांक ६ - | सेवानिवृत्तिवेतन व आनुषंगिक लाभासंदर्भात शिफारशी | ५६ |
| ७ | प्रकरण क्रमांक ७ - | समितीच्या शिफारशींमुळे अपेक्षित आर्थिक भार | ६३ |
| | | खंड-२ (प्रस्तावित) | |
| ८ | प्रकरण क्रमांक ८ - | सहाव्या वेतन आयोगाच्या वेतन संरचनेतील त्रुटीं आणि समितीकडे ऑनलाईन पध्दतीने नोंदविलेल्या सर्व वेतनवृध्दीविषयक मागण्यांबाबत शिफारशी | |
| ९ | प्रकरण क्रमांक ९ - | सर्वसाधारण प्रशासनिक बाबींसंदर्भात शिफारशी | |
| १० | प्रकरण क्रमांक १०- | सांविधानिक संस्था/प्राधिकरणांमधील संवर्गाच्या सुसूत्रिकरणाबाबत | |
| ११ | प्रकरण क्रमांक ११ - | अहवाल खंड-१ आणि खंड-२ मधील समितीच्या शिफारशींचा एकत्रित गोषवारा | |
| १२ | | ऋणनिर्देश | |
| १३ | जोडपत्र १ - | राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ ची स्थापना आणि कार्यकक्षा | |
| १४ | जोडपत्र २ - | वेतन पुर्नरचना कक्षातील अधिकारी / कर्मचारीवृंद | |
| १५ | जोडपत्र ३ - | वृत्तपत्र बातमी (प्रेस नोट) दिनांक ७ फेब्रुवारी, २० १८ | |

| | | | |
|---|---|---|---|
| १६ | जोडपत्र ४ - | समितीसमवेत चर्चेसाठी उपस्थित राहिलेल्या अधिकारी-कर्मचारी संघटनांची यादी | |
| १७ | जोडपत्र ५ - | समितीसमवेत चर्चेसाठी उपस्थित राहिलेल्या अधिकाऱ्यांची यादी | |

*****

# प्रकरण १ - प्रस्तावना

## १.१ राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ ची स्थापना :-

**१.१.१** केंद्रीय ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशींना अनुलक्षून केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या वेतन संरचनेत सुधारणा करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतल्यानंतर राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या वेतन संरचनेत सुधारणा करण्याकरिता शिफारशी करण्यासाठी राज्य शासनाने शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२१६/ प्र.क्र.५८/सेवा-९ दिनांक १७ जानेवारी, २०१७ अन्वये खालीलप्रमाणे राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ ची स्थापना केली होती आणि त्यानंतर शासन निर्णय क्र. वेपुर-१२१६/प्र.क्र.५८/सेवा-९, दिनांक १७ जुलै, २०१७ अन्वये समितीची कार्यकक्षा निश्चित करण्यात आली होती (जोडपत्र - १) :-

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. के.पी. बक्षी,<br>राज्य शासनाचे सेवानिवृत्त अप्पर मुख्य सचिव | अध्यक्ष |
| २. | प्रधान सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग | सदस्य |
| ३. | प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग | सदस्य |

**१.१.२ समितीची कार्यकक्षा:-**

१. सातव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींवरील केंद्र शासनाचे निर्णय विचारात घेऊन खाली नमूद केलेल्या पदांना सुधारित वेतनश्रेण्यांची शिफारस करणे:-

(अ) राज्य शासकीय पदे (अखिल भारतीय सेवेतील पदांव्यतिरिक्त)

(ब) जिल्हा परिषदांकडील पदे

(क) मंत्रालयातील पदांशी तत्सम नसलेली राज्य विधानमंडळ सचिवालयातील पदे

(ड) उच्च न्यायालयातील शेट्टी कमिशनच्या अखत्यारितील न्यायिक अधिकाऱ्यांची पदे वगळून अन्य सर्व राजपत्रित व अराजपत्रित पदे

(इ) अनुदानित शाळांतील शिक्षकीय व शिक्षकेतर पदे

(ई) राज्यातील कृषि व कृषितर विद्यापीठे तसेच या विद्यापीठांना संलग्न असलेल्या अशासकीय महाविद्यालयांतील शिक्षकेतर पदे

(फ) इतर अनुदान प्राप्त संस्थांतील पदे

२. प्रशासकीय विभागांनी आकृतिबंध निश्चित करताना अथवा अन्य कारणास्तव नवीन पदनिर्मिती केली असल्यास, तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २००९

अंमलात आल्यानंतर वेतनसंरचनेत सुधारणा केली असल्यास, आवश्यकतेनुसार अशा पदांच्या वेतन संरचनेचे पुन:परिक्षण करुन सुधारित वेतनश्रेण्यांची शिफारस करणे.

३. राज्य शासनाकडील विविध संवर्ग व त्यांच्याशी संलग्न वेतनश्रेणी यांचा विचार करुन प्रशासनिक सुसूत्रता आणण्याच्या दृष्टीकोनातून विविध प्रशासकीय विभागातील समकक्ष वा तत्सम संवर्गांचे एकत्रिकरण करण्याबाबत शिफारशी करणे.

४. शासनाच्या वेगवेगळ्या नियामक प्राधिकरणांतील पदांच्या आकृतीबंधात सुसूत्रता आणण्यासाठी वेगवेगळ्या संवर्गांचे समानीकरण व एकत्रिकरण करण्याच्या दृष्टीने शासनास शिफारशी करणे.

५. सुधारित वेतनश्रेणी सुचवितांना ज्या पदांना विद्यमान वेतनश्रेणीत विशेष वेतन/उच्च प्रारंभिक वेतनवाढी / व्यावसायिक पात्रतेसंबधात वेतनवाढी इत्यादी मंजूर करण्यात आल्या आहेत, याबाबत शिफारस करणे.

६. सहाव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने मंजूर केलेल्या सुधारित वेतन संरचनेत त्रुटी असल्यास सदर त्रुटींचे परिक्षण करुन सुधारित वेतनश्रेण्यांची शिफारस करणे.

७. निवृत्तिवेतनधारकांची निवृत्तिवेतन निश्चिती व आनुषंगिक बाबींसंबधी शिफारशी करणे.

### १.१.३ समितीची कार्यपध्दती:-

समितीस यापूर्वीच्या वेतन सुधारणा समित्यांच्या कार्यपध्दतीचा अभ्यास करुन आपली कार्यपध्दती निश्चित करण्याची मुभा देण्यात आली होती. त्यानुसार स्वतंत्र वेबपोर्टलवर ऑनलाईन पध्दतीने समितीच्या विचारार्थ निवेदने मागविण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

समितीस वित्त विभागातील वेतन पुनर्रचना कक्षामार्फत (जोडपत्र - २) सहकार्य उपलब्ध करुन देण्यात आले होते.

राज्य वेतन सुधारणा समितीकडे सर्व अधिकारी - कर्मचारी संघटना, वैयक्तिक अधिकारी / कर्मचारी तसेच प्रशासकीय विभाग प्रमुख यांना सुलभपणे व सहजतेने मागण्या नोंदविता याव्यात याकरिता मे. केपीएमजी या सल्लागार संस्थेच्या सहाय्याने https://www.mahaseventhpay.in हे वेब पोर्टल कार्यान्वित करण्यात आले होते. याबाबत वृत्तपत्र बातमी (प्रेस नोट) आणि www.maharashtra.gov.in या राज्य शासनाच्या अधिकृत संकेतस्थळाच्या माध्यमातून व्यापक प्रसिध्दी देण्यात आली होती. (जोडपत्र - ३) या वेब पोर्टलवर ऑनलाईन मागणी कशाप्रकारे नोंदविता येईल यासंदर्भात सविस्तर सूचना वेब पोर्टल

वर प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. तसेच पोर्टलवर मागणी नोंदविण्यासाठी सर्व संबंधितांना ई-संदेश (ई-मेल) व भ्रमणध्वनी क्रमांकाचा वापर करुन नोंदणी करण्याची सुविधा आणि मागणी नोंदविण्याकरिता सुलभ नमुना उपलब्ध करुन देण्यात आला होता. नोंदणी करु इच्छिणाऱ्यांच्या मदतीसाठी हेल्प लाईन (ई-संदेश व भ्रमणध्वनीद्वारे) उपलब्ध करून देण्यात आली होती. सर्व अधिकारी/कर्मचारी आणि संघटनांना ऑनलाईन मागणी नोंदविण्यासाठी प्रथमत: दि.७/२/२०१८ ते दि.२८/२/२०१८ पर्यंत मुदत देण्यात आली होती. त्यानंतर अधिकारी-कर्मचारी संघटनांच्या मागणीनुसार ही मुदत शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. वेपुर-१२१७/प्र.क्र.२४/सेवा-९, दि. १ मार्च, २०१८ अन्वये (जोडपत्र - ४) दि. १५/३/२०१८ पर्यंत वाढविण्यात आली होती.

अधिकारी - कर्मचारी संघटना तसेच वैयक्तिकरित्या अधिकारी - कर्मचाऱ्यांनी समितीकडे ऑनलाईन पध्दतीने एकूण ३७३९ मागण्या नोंदविल्या होत्या. सदर मागण्यांसंदर्भात प्रशासकीय विभागांना अभिप्राय नोंदविण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. सर्व संबंधित संघटना, अधिकारी-कर्मचारी आणि प्रशासकीय विभागप्रमुखांना मागण्यांबाबत त्यांचे म्हणणे समितीपुढे प्रत्यक्ष मांडता यावे याकरिता माहे एप्रिल, २०१८ ते ऑक्टोबर,२०१८ या कालावधीत महाराष्ट्र जलसंपती नियामक प्राधिकरण, जागतिक व्यापार केंद्र (वर्ल्ड ट्रेड सेंटर), कफ परेड, ९ वा मजला, मुंबई येथे विभागवार बैठकांचे आयोजन करण्यात आले होते. बैठकांच्या कार्यक्रमाबाबत समितीच्या वेब पोर्टलवर आगावू प्रसिध्दी देण्यात आली होती तसेच मागणी नोंदविलेल्या सर्व संबंधितांना तसेच संबधित प्रशासकीय विभागांना लघु संदेश (एसएमएस) व ई-संदेश या माध्यमातून बैठकीची सूचना आणि त्याबाबत स्मरण देण्यात आले होते. सर्वसंबंधितांना समितीपुढे त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली होती.

समितीसमवेत चर्चेसाठी उपस्थित राहिलेल्या अधिकारी-कर्मचारी संघटनांची यादी जोडपत्र-४ मध्ये दर्शविली आहे. वैयक्तिकरित्या मागण्या नोंदविलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांची संख्या मोठी असल्याने त्याबाबतचा तपशिल अहवालासोबत देण्यात आलेला नाही. परंतु सदर तपशिल वित्त विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्याबाबत वित्त विभागास कळविण्यात येईल.

विविध अधिकारी-कर्मचारी संघटना तसेच वैयक्तिकरित्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या ऑनलाईन निवेदनांबरोबरच त्यांनी समिती आणि वित्त विभागास सादर केलेल्या इतर लेखी निवेदनांचा व समितीच्या बैठकीत केलेल्या सूचनांचा तसेच प्रशासकीय

विभागाचे प्रमुख/त्यांचे प्रतिनिधी यांनी बैठकीत मांडलेल्या मुद्यांचाही समितीने विचार केला आहे.

समितीकडे वेबपोर्टलवर ऑनलाईन मागण्या नोंदविण्याचा निर्णय घेण्यात आला होता, तरीदेखील काही संवर्गांच्या संदर्भात ऑनलाईन मागण्या न नोंदविता समिती / वित्त विभागाकडे लेखी स्वरूपात (ऑफलाईन) निवेदने प्राप्त झाली होती. समितीने सदर निवेदनांमधील मागण्यादेखील शिफारशी करताना विचारात घेतल्या आहेत.

विभागवार आयोजित केलेल्या बैठकांमध्ये संबधित प्रशासकीय विभागांचे अतिरिक्त मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव तसेच त्यांचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित असलेल्या अधिकाऱ्यांची मते / सूचना समितीने विचारात घेतल्या आहेत. सदर अधिकाऱ्यांची यादी जोडपत्र - ५ मध्ये देण्यात आलेली आहे.

तसेच मा. सर्वश्री श्रीकांत गोविंद देशपांडे, दत्तात्रय सावंत, नागो पुंडलिक गाणार, विधानपरिषद सदस्य, मा. श्री.ज.मो. अभ्यंकर (राज्यमंत्री दर्जा), मा. श्री भगवान साळुंखे (माजी विधानमंडळ सदस्य) यांनीदेखील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेण्यांसंदर्भात समितीसमवेत दि. ४ ऑक्टोबर, २०१८ रोजी चर्चा केली आहे.

**१.१.४** वेतनवृध्दी आणि वेतनत्रुटीसंदर्भातील समितीकडे प्राप्त मागण्यांची संख्या तसेच स्वरूप पाहता याबाबतच्या शिफारसींसाठी तपासणीसाठी अजून काही कालावधी अपेक्षित आहे. तसेच ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारसीनुसार केंद्र शासनाने विहित केलेल्या वेतननिश्चितीच्या २.५७ या सुत्रानुसार वेतन अदा करण्याची शासनाची प्राथमिकता विचारात घेऊन समितीने आपला अहवाल २ खंडात सादर करण्याचा निर्णय घेतला आहे. खंड - १ मध्ये खालील प्रकरणांचा समावेश करण्यात आलेला आहे:-

प्रकरण क्रमांक १- प्रस्तावना
प्रकरण क्रमांक २ - केंद्रीय ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशींचा सारांश
प्रकरण क्रमांक ३ - राज्याची आर्थिक स्थिती - दृष्टीक्षेप
प्रकरण क्रमांक ४ - राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या सुधारित वेतनश्रेण्यांबाबत शिफारशी
प्रकरण क्रमांक ५ - सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना
प्रकरण क्रमांक ६ - सेवानिवृत्तिवेतन व आनुषंगिक लाभासंदर्भात शिफारशी
प्रकरण क्रमांक ७ - समितीच्या शिफारशींमुळे अपेक्षित आर्थिक भार

अहवालाचा खंड - २ स्वतंत्रपणे सादर करण्यात येत असून त्यामध्ये प्रामुख्याने पुढील प्रकरणांचा समावेश राहील

| | |
|---|---|
| प्रकरण क्रमांक ८ - | सहाव्या वेतन आयोगाच्या वेतन संरचनेतील त्रुटी आणि समितीकडे ऑनलाईन पध्दतीने नोंदविलेल्या सर्व वेतनवृध्दीविषयक मागण्यांबाबत शिफारशी |
| प्रकरण क्रमांक ९ - | सर्वसाधारण प्रशासनिक बाबींसंदर्भात शिफारशी |
| प्रकरण क्रमांक १० - | सांविधानिक संस्था/प्राधिकरणांमधील संवर्गांच्या सुसूत्रिकरणाबाबत |
| प्रकरण क्रमांक ११ | अहवाल खंड-१ आणि खंड-२ मधील समितीच्या शिफारशींचा एकत्रित गोषवारा |

*******

## प्रकरण २ - केंद्रीय ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशींचा सारांश

केंद्र शासनाने दिनांक २८ फेब्रुवारी, २०१४ रोजी ७ व्या वेतन आयोगाची स्थापना केली होती. या वेतन आयोगाने आपला अहवाल दिनांक १९ नोव्हेंबर, २०१५ रोजी सादर केला होता. केंद्रीय वित्त मंत्रालयाने काही सुधारणांसह हा अहवाल स्वीकारला व त्याबाबतचे आदेश दिनांक १६ ऑगस्ट, २०१६ रोजी निर्गमित केले आहेत. केंद्रीय ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशींची ठळक वैशिष्ठे आणि ज्या शिफारशी केंद्र शासनाने सुधारित स्वरुपात स्वीकृत केल्या आहेत, त्याची संक्षिप्त माहिती पुढे नमूद केली आहे.

१. **किमान वेतन:** केंद्र शासनाने किमान वेतन निश्चित करताना १५ व्या भारतीय कामगार परिषद, १९५७ मध्ये कुटुंबाच्या गरजा ठरविताना निश्चित केलेल्या अटी विचारात घेतल्या आहेत. यामध्ये कुटुंबातील पती - पत्नी आणि २ मुले या घटकांच्या अन्न, वस्त्र, निवास, इंधन व अन्य बाबींवरील खर्च विचारात घेऊन रु.१८, ०००/- इतके किमान वेतन निश्चित केले आहे.

२. **कमाल वेतन:** उच्चतम (Apex) वेतनश्रेणीतील पदासाठी रु.२, २५,०००/- प्रतिमाह कमाल इतके वेतन निश्चित करण्यात आले असून मंत्रिमंडळ सचिव आणि त्या वेतनश्रेणीत कार्यरत असलेल्या पदांना रु. २,५०,०००/- प्रतिमाह इतके कमाल वेतन निश्चित करण्यात आले आहे.

३. **आर्थिक बाबी:** सातव्या वेतन आयोगामुळे केंद्र शासनाच्या सन २०१६-१७ या आर्थिक वर्षातील खर्चात एकूण रुपये १ लक्ष २ हजार १०० कोटी इतकी वाढ होत आहे. या पैकी वेतनातील सुधारणेमुळे रुपये ३९ हजार १०० कोटी (१६ %), भत्त्यांतील सुधारणेमुळे रुपये २९ हजार ३०० कोटी (६३ %) आणि निवृत्तिवेतनातील सुधारणेमुळे रुपये ३३ हजार ७०० कोटी (२४%) वाढ होत आहे.

४. **सुधारित वेतन संरचना:** सहाव्या वेतन आयोगातील वेतनबँड व ग्रेड वेतन संरचनेतील अडचणी विचारात घेऊन वेतनबँड व ग्रेड वेतन ही संकल्पना रद्द करुन नवीन वेतन संरचना (Pay Matrix) तयार करण्यात आली आहे. ग्रेड वेतन आणि त्याच्याशी संलग्न वेतनबँडमधील नियुक्तीच्या वेळचे बँड वेतन एकत्रितरित्या विचारात घेऊन Pay Matrix मधील स्तरांचे (Level) किमान वेतन निश्चित केले आहे. यामुळे या पुढे कर्मचाऱ्यांचा दर्जा Pay Matrix मधील स्तरावरुन ठरेल.

६ व्या वेतन आयोगात १९ वेतन संरचना विहित करण्यात आल्या होत्या. त्यास अनुसरून ७ व्या वेतन आयोगाच्या सुधारित वेतन मॅट्रिक्समध्ये एकूण १९ वेतन स्तर आणि या १९ वेतनस्तरांकरिता १ ते ४० पर्यंत वेगवेगळे वेतनवाढीचे टप्पे विहित करण्यात आले आहेत. सुधारित मॅट्रिक्समध्ये वेतनवाढीचा दर ३% आहे. ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशींच्या आनुषंगाने केंद्र शासनाने स्वीकारलेले सुधारित वेतन संरचनेचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे.

**PAY MATRIX (CIVILIAN EMPLOYEES)** **APPENDIX-I**

| Pay Band | 5200-20200 | | | | | 9300-34800 | | | | 15600-39100 | | | 37400-67000 | | | 67000-79000 | 75500-80000 | 80000 | 90000 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Grade Pay | 1800 | 1900 | 2000 | 2400 | 2800 | 4200 | 4600 | 4800 | 5400 | 5400 | 6600 | 7600 | 8700 | 8900 | 10000 | | | | |
| Level | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 13A | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 1 | 18000 | 19900 | 21700 | 25500 | 29200 | 35400 | 44900 | 47600 | 53100 | 56100 | 67700 | 78800 | 123100 | 131100 | 144200 | 182200 | 205400 | 225000 | 250000 |
| 2 | 18500 | 20300 | 22400 | 26300 | 30100 | 36500 | 46200 | 49000 | 54700 | 57800 | 69700 | 81200 | 126800 | 135000 | 148500 | 187700 | 211600 | | |
| 3 | 19100 | 21100 | 23100 | 27100 | 31000 | 37600 | 47600 | 50500 | 56300 | 59500 | 71800 | 83600 | 130600 | 139100 | 153000 | 193300 | 217900 | | |
| 4 | 19700 | 21700 | 23800 | 27900 | 31900 | 38700 | 49000 | 52000 | 58000 | 61300 | 74000 | 86100 | 134500 | 143300 | 157600 | 199100 | 224400 | | |
| 5 | 20300 | 22400 | 24500 | 28700 | 32900 | 39900 | 50500 | 53600 | 59700 | 63100 | 76200 | 88700 | 138500 | 147600 | 162300 | 205100 | | | |
| 6 | 20900 | 23100 | 25200 | 29600 | 33900 | 41100 | 52000 | 55200 | 61500 | 65000 | 78500 | 91400 | 142700 | 152000 | 167200 | 211300 | | | |
| 7 | 21500 | 23800 | 26000 | 30500 | 34900 | 42300 | 53600 | 56900 | 63300 | 67000 | 80900 | 94100 | 147000 | 156600 | 172200 | 217600 | | | |
| 8 | 22100 | 24500 | 26800 | 31400 | 35900 | 43600 | 55200 | 58600 | 65200 | 69000 | 83300 | 96900 | 151400 | 161300 | 177400 | 224100 | | | |
| 9 | 22800 | 25200 | 27600 | 32300 | 37000 | 44900 | 56900 | 60400 | 67200 | 71100 | 85800 | 99800 | 155900 | 166100 | 182700 | | | | |
| 10 | 23500 | 26000 | 28400 | 33300 | 38100 | 46200 | 58600 | 62200 | 69200 | 73200 | 88400 | 102800 | 160600 | 171100 | 188200 | | | | |
| 11 | 24200 | 26800 | 29300 | 34300 | 39200 | 47600 | 60400 | 64100 | 71300 | 75400 | 91100 | 105900 | 165400 | 176200 | 193800 | | | | |
| 12 | 24900 | 27600 | 30200 | 35300 | 40400 | 49000 | 62200 | 66000 | 73400 | 77700 | 93800 | 109100 | 170400 | 181500 | 199600 | | | | |
| 13 | 25600 | 28400 | 31100 | 36400 | 41600 | 50500 | 64100 | 68000 | 75600 | 80000 | 96600 | 112400 | 175500 | 186900 | 205600 | | | | |
| 14 | 26400 | 29300 | 32000 | 37500 | 42800 | 52000 | 66000 | 70000 | 77900 | 82400 | 99500 | 115800 | 180800 | 192500 | 211800 | | | | |
| 15 | 27200 | 30200 | 33000 | 38600 | 44100 | 53600 | 68000 | 72100 | 80200 | 84900 | 102500 | 119300 | 186200 | 198300 | 218200 | | | | |
| 16 | 28000 | 31100 | 34000 | 39800 | 45400 | 55200 | 70000 | 74300 | 82600 | 87400 | 105600 | 122900 | 191800 | 204200 | | | | | |
| 17 | 28800 | 32000 | 35000 | 41000 | 46800 | 56900 | 72100 | 76500 | 85100 | 90000 | 108800 | 126600 | 197600 | 210300 | | | | | |
| 18 | 29700 | 33000 | 36100 | 42200 | 48200 | 58600 | 74300 | 78800 | 87700 | 92700 | 112100 | 130400 | 203500 | 216600 | | | | | |
| 19 | 30600 | 34000 | 37200 | 43500 | 49600 | 60400 | 76500 | 81200 | 90300 | 95500 | 115500 | 134300 | 209600 | | | | | | |
| 20 | 31500 | 35000 | 38300 | 44800 | 51100 | 62200 | 78800 | 83600 | 93000 | 98400 | 119000 | 138300 | 215900 | | | | | | |
| 21 | 32400 | 36100 | 39400 | 46100 | 52600 | 64100 | 81200 | 86100 | 95800 | 101400 | 122600 | 142400 | | | | | | | |
| 22 | 33400 | 37200 | 40600 | 47500 | 54200 | 66000 | 83600 | 88700 | 98700 | 104400 | 126300 | 146700 | | | | | | | |
| 23 | 34400 | 38300 | 41800 | 48900 | 55800 | 68000 | 86100 | 91400 | 101700 | 107500 | 130100 | 151100 | | | | | | | |
| 24 | 35400 | 39400 | 43100 | 50400 | 57500 | 70000 | 88700 | 94100 | 104800 | 110700 | 134000 | 155600 | | | | | | | |
| 25 | 36500 | 40600 | 44400 | 51900 | 59200 | 72100 | 91400 | 96900 | 107900 | 114000 | 138000 | 160300 | | | | | | | |
| 26 | 37600 | 41800 | 45700 | 53500 | 61000 | 74300 | 94100 | 99800 | 111100 | 117400 | 142100 | 165100 | | | | | | | |
| 27 | 38700 | 43100 | 47100 | 55100 | 62800 | 76500 | 96900 | 102800 | 114400 | 120900 | 146400 | 170100 | | | | | | | |
| 28 | 39900 | 44400 | 48500 | 56800 | 64700 | 78800 | 99800 | 105900 | 117800 | 124500 | 150800 | 175200 | | | | | | | |
| 29 | 41100 | 45700 | 50000 | 58500 | 66600 | 81200 | 102800 | 109100 | 121300 | 128200 | 155300 | 180500 | | | | | | | |
| 30 | 42300 | 47100 | 51500 | 60300 | 68600 | 83600 | 105900 | 112400 | 124900 | 132000 | 160000 | 185900 | | | | | | | |
| 31 | 43600 | 48500 | 53000 | 62100 | 70700 | 86100 | 109100 | 115800 | 128600 | 136000 | 164800 | 191500 | | | | | | | |
| 32 | 44900 | 50000 | 54600 | 64000 | 72800 | 88700 | 112400 | 119300 | 132500 | 140100 | 169700 | 197200 | | | | | | | |
| 33 | 46200 | 51500 | 56200 | 65900 | 75000 | 91400 | 115800 | 122900 | 136500 | 144300 | 174800 | 203100 | | | | | | | |
| 34 | 47600 | 53000 | 57900 | 67900 | 77300 | 94100 | 119300 | 126600 | 140600 | 148600 | 180000 | 209200 | | | | | | | |
| 35 | 49000 | 54600 | 59600 | 69900 | 79600 | 96900 | 122900 | 130400 | 144800 | 153100 | 185400 | | | | | | | | |
| 36 | 50500 | 56200 | 61400 | 72000 | 82000 | 99800 | 126600 | 134300 | 149100 | 157700 | 191000 | | | | | | | | |
| 37 | 52000 | 57900 | 63200 | 74200 | 84500 | 102800 | 130400 | 138300 | 153600 | 162400 | 196700 | | | | | | | | |
| 38 | 53600 | 59600 | 65100 | 76400 | 87000 | 105900 | 134300 | 142400 | 158200 | 167300 | 202600 | | | | | | | | |
| 39 | 55200 | 61400 | 67100 | 78700 | 89600 | 109100 | 138300 | 146700 | 162900 | 172300 | 208700 | | | | | | | | |
| 40 | 56900 | 63200 | 69100 | 81100 | 92300 | 112400 | 142400 | 151100 | 167800 | 177500 | | | | | | | | | |

५. **वेतननिश्चितीचा गुणांक (Fitment Factor)**: सातव्या वेतन आयोगामध्ये सर्व गटातील अधिकारी-कर्मचाऱ्यांकरिता दि. १.१.२०१६ रोजीच्या वेतन संरचनेतील मूळ वेतनाच्या (वेतनबँडमधील वेतन अधिक ग्रेड वेतन) २.५७ पट हा वेतननिश्चितीचे सूत्र विहित करण्यात आले आहे.

६. **वार्षिक वेतनवाढ**: वार्षिक वेतनवाढीचा दर ३% कायम ठेवण्यात आला आहे.

७. **वेतननिश्चिती**: दि. १.१.२०१६ म्हणजेच वेतन आयोगाच्या अमलबजावणीच्या दिनांकास कर्मचाऱ्याच्या मूळ वेतनाला २.५७ हया गुणाकांने गुणून करुन येणारी रक्कम (पूर्ण रूपयात नसल्यास नजीकच्या पूर्ण रूपयात घेऊन) त्या कर्मचाऱ्यांच्या ग्रेड वेतनाशी निगडीत वेतन स्तरामध्ये दर्शविलेल्या वेतनाच्या टप्पावर निश्चित करण्यात येईल. असे

करताना गुणाकांने गुणून येणारी रक्कम जर वेतन स्तरातील वेतनाच्या टप्प्यात उपलब्ध नसेल तर त्या टप्प्याच्या लगतच्या पुढील वेतन टप्प्यावर वेतन निश्चित करण्यात येईल.

एकाच संवर्गात सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या वेतनात ६ व्या वेतन आयोगाच्या वेतनसंरचनेत आढळणारी तफावत विचारात घेऊन ७ व्या वेतन आयोगात सरळसेवेने नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांचे नियुक्तीचे वेतन हे संबंधित वेतन स्तरातील किमान वेतन राहील, अशी शिफारस केली आहे.

८. **सुधारित आश्वासित प्रगती योजना**: समितीने या योजनेमध्ये संघटीत अ गटातील पदे वगळता सर्व संवर्गाना/पदांना ६ व्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार १०, २०, व ३० वर्षांच्या सेवेच्या निकषानुसार लागू करण्याची शिफारस केली आहे. यामध्ये लाभ घेणाऱ्या कर्मचाऱ्यांची वेतननिश्चिती लगतच्या पुढील वेतनस्तरामध्ये पदोन्नतीच्या वेतननिश्चितीच्या नियमानुसार करण्यात येईल.

सुधारित आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत लाभाच्या पात्रतेसाठी गोपनीय अहवालाच्या प्रतवारीच्या निकषात सुधारण्यात आली असून सदर प्रतवारी 'चांगला' वरुन 'अत्यंत चांगला' करण्यात आली आहे. जे कर्मचारी सेवेच्या पहिल्या २० वर्षात आश्वासित प्रगती योजना किंवा पदोन्नतीसाठी निर्धारित केलेल्या गोपनीय अहवालाच्या प्रतवारीचे निकष पूर्ण करणार नाहीत त्यांना वेतनवाढी देण्यात येऊ नये, अशी शिफारस आयोगाने केली आहे.

९. **मुख्यालय व क्षेत्रिय संवर्गात समकक्षता**: आयोगाने मुख्यालय व क्षेत्रिय कार्यालयातील पदांमध्ये समकक्षता ठेवण्याची शिफारस केली आहे. उदा. सहाय्यक, लघुलेखक.

१०. **संवर्ग पूनरिक्षण (Cadre Review)**: आयोगाने गट अ संवर्गाच्या पूनरिक्षण कार्यपध्दतीत सुधारणा करण्यात यावी, असे सूचविले आहे.

११. **भत्ते** (Allowance): आयोगाने एकूण ५२ भत्ते रद्द केले असून अन्य ३६ भत्त्यांची स्वतंत्र वर्गवारी न ठेवता ते विद्यमान किंवा नव्याने प्रस्तावित केलेल्या भत्त्यांमध्ये समाविष्ट केले आहेत.

१२. **घरभाडे भत्ता**: सातव्या वेतन आयोगामध्ये मूळ वेतनात सुधारणा करण्यात आली असल्याने **X, Y आणि Z** वर्गवारीतील शहरांसाठी घरभाडे भत्त्याचा दर सुधारित वेतनाच्या **२४, १६, ८** % या प्रमाणे मंजूर करण्याची शिफारस केली आहे.

तसेच महागाईच्या भत्त्याचा दर **५०** % पेक्षा अधिक होईल तेव्हा घरभाडे भत्त्याचा दर अनुक्रमे **२७, १८, ९** टक्के होईल. तसेच ज्यावेळी महागाई भत्ता १०० % पेक्षा अधिक होईल, त्यावेळी हेच घरभाडे भत्त्याचे दर अनुक्रमे ३० %, २० % आणि १० % होईल.

**१३. अग्रिम**: सर्व व्याजरहित अग्रिमे रद्द करण्यात आली आहेत. व्याज आकारणी करण्यात येणाऱ्या अग्रिमांपैकी वैयक्तिक संगणक अग्रिम व घर बांधणी अग्रिम हे दोन अग्रिम चालू ठेवण्यात आले असून घर बांधणी अग्रिमाची मर्यादा रुपये ७.५ लक्षवरुन रुपये २५.०० लक्ष करण्यात आली आहे.

**१४. कर्मचारी गट विमा योजना**: वेतन आयोगाने गट विमा योजनेच्या प्रिमियमच्या आणि विमा संरक्षणाच्या रकमेत पुढीलप्रमाणे सुधारणा करण्याची शिफारस केली आहे.

| | विद्यमान | | सुधारित | |
|---|---|---|---|---|
| कर्मचाऱ्याचा वेतन स्तर | मासिक वर्गणी (रुपये) | विमा संरक्षण (रुपये) | मासिक वर्गणी (रुपये) | विमा संरक्षण (रुपये) |
| १० आणि त्यापेक्षा पुढील | १२० | १२०००० | ५००० | ५०००००० |
| ६ ते ९ | ६० | ६०००० | २५०० | २५००००० |
| १ ते ५ | ३० | ३०००० | १५०० | १५००००० |

**१५. वैद्यकीय सोयी - सुविधा**: आयोगाने सर्व कर्मचारी आणि सेवानिवृत्तांसाठी आरोग्य विमा योजनेची शिफारस केली आहे.

**१६. निवृत्तिवेतन**: ७ व्या वेतन आयोगाने दि. ०१.०१.२०१६ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचे निवृत्तिवेतन निश्चित करण्यासाठी दोन प्रकारची सूत्रे विहित केली आहेत. त्यामुळे पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या व तितक्याच वर्षांची त्याच वेतनश्रेणीत सेवा करुन आता दि. ०१.०१.२०१६ रोजी व त्यानंतर सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या निवृत्तिवेतनात समानता राहील.

(१) जे कर्मचारी दि. ०१.०१.२०१६ पूर्वी सेवानिवृत्त झालेले आहेत, अशा निवृत्तिवेतनधारकांची वेतननिश्चिती ज्या वेतन संरचनेत ते सेवानिवृत्त झाले आहेत, त्यास अनुरुप वेतन मॅट्रिक्समधील स्तराच्या किमान वेतनावर करण्यात यावी. त्यानंतर असुधारित वेतन संरचनेतील वेतनवाढींची संख्या विचारात घेऊन वेतन मॅट्रिक्समधील स्तरामध्ये प्रथम

मानीव वेतन निश्चित करण्यात यावे. अशा रक्कमेच्या ५०% रक्कम हे सुधारित निवृत्तिवेतन राहील.

(२) सुधारित निवृत्तिवेतनाची परीगणना करण्यासाठी विद्यमान निवृत्तिवेतनास २.५७ ने गुणल्यानंतर येणारे विद्यमान मूळ निवृत्तिवेतन ठरेल.

या दोन्ही पर्यायाद्वारे परिगणना केल्यानंतर जे निवृत्तिवेतन अधिक असेल, ते त्या निवृत्तिवेतनधारकास अनुज्ञेय ठरेल.

**१७. सेवानिवृत्ती उपदान**: आयोगाने उपदानाची मर्यादा रुपये १० लक्ष वरुन २० लक्ष करण्याची शिफारस केली. तसेच ही मर्यादा जेव्हा महागाई भत्त्यामध्ये ५० टक्के वाढ होईल, तेव्हा २५ टक्क्यांनी वाढविण्याची शिफारस केली आहे.

**१८. मृतांच्या नातेवाईकास एकरकमी सानुग्रह अनुदान**: संरक्षण दलाप्रमाणे नागरी सेवेतील कर्मचाऱ्यांनाही या योजनेचा लाभ देण्यात येऊन त्याच्या दरातही सुधारणा करावी, अशी शिफारस केली.

**१९. नवीन निवृत्तिवेतन योजना**: आयोगाने नवीन निवृत्तिवेतन योजनेच्या तक्रारी विचारात घेऊन योजनेच्या कार्यपध्दतीत सुधारणा करण्याचा तसेच यामधील अडचणी दूर करण्यासाठी अत्यंत कार्यक्षम तक्रार निवारण यंत्रणा उभारण्याची करण्याची शिफारस केली आहे.

**२०. नियामक प्राधिकरणे**: आयोगाने निवडक नियामक प्राधिकरणाच्या अध्यक्षांना रु. ४.५ लक्ष व सदस्यांना रु. ४.० लक्ष प्रतिमहा या प्रमाणे एकत्रित वेतनाची शिफारस केली आहे. तसेच सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत त्यांचे निवृत्तिवेतन या एकत्रित वेतनातून वजा करण्यात येऊ नये आणि महागाई भत्त्याचा दर ५० % पेक्षा अधिक झाल्यानंतर एकत्रित वेतनामध्ये २५ % वाढ करण्याची शिफारस केली आहे.

**२१. कामगिरीवर आधारित वेतन (Performance Related Pay)**: आयोगाने कामगिरीवर आधारित वेतनाची सर्व केंद्रीय कर्मचाऱ्यांकरिता शिफारस केली असून विद्यमान लाभांशाची (Bonus) संकल्पना बंद करण्यात यावी, अशी शिफारस केली आहे.

**२२. वेतन आयोगाच्या शिफारशींच्या अंमलबजावणीचा दिनांक**: दि. १ जानेवारी, २०१६.

*******


# प्रकरण - ३ राज्याची आर्थिक स्थिती - दृष्टीक्षेप

देशांतर्गत सकल राष्ट्रीय उत्पादनात (Gross Domestic Product - GDP) महाराष्ट्र राज्याच्या अर्थव्यवस्थेचा सर्वात मोठा म्हणजे १५ % वाटा आहे. सन २०११-१२ ते २०१७-१८ या कालावधीत राज्याचे सकल उत्पन्न (Gross State Domestic Product - GSDP) १२ % वार्षिक चक्रवाढ दराने (CAGR) वाढून रु. २५ लक्ष कोटीपर्यंत पोहोचले आहे. शासनाच्या प्रभावी आर्थिक व्यवस्थापनाद्वारे, राज्य सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात लक्षणीय प्रगती करत आहे. मर्यादीत महसूली उत्पन्न आणि वाढणारा महसूली तसेच भांडवली खर्च असूनही राज्य, राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन (Fiscal Responsibility & Budgetary Management - FRBM) कायद्यातील बहुतेक उद्दीष्टे साध्य करण्यात यशस्वी ठरले आहे.

## ३.१ राज्याची सध्याची आर्थिक स्थिती

गेल्या ९ वर्षांत राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन कायद्याने निर्धारित केलेले वित्तीय तुटीचे प्रमाण ३ % पेक्षा लक्षणीय कमी राखण्यात राज्य यशस्वी ठरले आहे. सन २००९ - १० मधील राज्याची वित्तीय तूट ३.१ % वरून २०१७-१८ च्या सुधारित अंदाजानुसार (Revised Estimate) घटून १.९ % झाली आहे. तसेच सन २००९ -१० मधील राज्याची २.२ % महसूली तूट घटून सन २०१७-१८ च्या सुधारित अंदाजानुसार ०.६ % पर्यंत खाली आली आहे.

आलेख १.१: तुटीचा कल - राज्याचे सकल उत्पन्न (Gross State Domestic Product - GSDP %) (२००५-०६ ते २०१८-२०१९ अर्थसंकल्पीय अंदाज)





स्त्रोत: संबंधित वर्षातील लेखे आणि जमा व खर्चाची अंदाजपत्रके

तथापि, २०१८ -१९ मध्ये ७ व्या वेतन आयोगाच्या वाढीव खर्चामुळे महसूली तूट आणि वित्तीय तूट अनुक्रमे ०.६ %आणि १.८ % पर्यंत राहणे अपेक्षित आहे.

### ३.२ उत्पन्नाचा कल

सन २००५-०६ ते २०१७-१८ या दरम्यान राज्याच्या एकूण उत्पन्नात महसूली जमेतील वाढीमुळे १२.७ % वार्षिक चक्रवाढ दराने वाढ झाली आहे. सन २०१७-१८ मधील राज्याचे एकूण उत्पन्न रु. ३,०६,११३ कोटी आहे आणि सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पीय अंदाजानुसार ते रु. ३,३८, ९२० कोटी पर्यंत वाढणे अपेक्षित आहे. तथापि, राज्याच्या सकल उत्पन्नातील एकूण जमा रकमेच्या प्रमाणात घट होत आहे. सन २००५-०६ मध्ये राज्याच्या सकल उत्पन्नात एकूण जमेचा असलेला १४.९ % हिस्सा सन २०१७-१८ मध्ये घटून १२.३ % झाला आहे. राज्याच्या एकूण महसूली उत्पन्नात कर महसूल आणि करेतर महसूलाचा ८५ % इतका प्रमुख वाटा आहे आणि सकल उत्पन्नापैकी भांडवली उत्पन्नाचा वाटा केवळ १५ % आहे.

<u>आलेख १.२</u>: उत्पन्न वाढीचा कल (रु. कोटी) (२००५-०६ ते २०१८-१९ अर्थसंकल्पीय अंदाज)





स्त्रोत: संबंधित वर्षातील लेखे आणि जमा व खर्चाची अंदाजपत्रके

### ३.२.१ महसूली उत्पन्न

राज्याचे महसूली उत्पन्न सन २००५-०६ मध्ये रु. ३९,४७४ कोटी (एकूण सकल उत्पन्नाच्या ५४.४% ) होते. यामध्ये १३.८ % वार्षिक चक्रवाढ दराने वाढ होऊन सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पीय अंदाजानुसार ते रु. २,१०,८२४ कोटी (एकूण उत्पन्नाच्या ६२.२ %) इतके झाले आहे.


सन २००५-०६ ते २०१८-१९ या दरम्यान राज्याच्या अर्थसंकल्पातील एकूण महसूली उत्पन्नात राज्याचा स्वत:चा महसूल ६७.७ % तर केंद्रीय करांद्वारे प्राप्त होणारे उत्पन्न ११.७ % आणि अनुदान ९.६ % इतके आहे.


आलेख १.३: महसूली उत्पन्नाचा कल (रु. कोटी)




राज्याचा कर महसूल सन २०१६-१७ मध्ये रु.१,३६,६१६ कोटी रुपये होता. त्यात वाढ होऊन २०१७-१८ मध्ये तो रु.१,६४,७९७ कोटी झाला. ही वाढ २०.८ % इतकी आहे. ही वाढ प्रामुख्याने वस्तु व सेवा कर (Goods and Service Tax - GST) प्रणालीद्वारे मोठ्या प्रमाणात कर वसूली केल्यामुळे झाली आहे. सन २०१८-१९ मध्ये कर महसूल १४.० % वाढून रू. १,८८,०४० कोटी इतका होणे अपेक्षित आहे.

आलेख १.४ आणि १.५: राज्याच्या कर महसूलातील घटक - सन २०१६-१७ आणि - सन २०१८-१९ (अर्थसंकल्पीय अंदाज)





स्त्रोत: संबंधित वर्षातील लेखे आणि जमा व खर्चाची अंदाजपत्रके

वस्तु व सेवा कर लागू करण्याआधी राज्याच्या स्वत: च्या कर महसूलाचा मुख्य घटक विक्रीकर होता व त्याचा हिस्सा ६० % होता. कर प्रणालीतील बदलामुळे वस्तु व सेवा कर राज्याच्या स्वत: च्या कर महसूलात प्रमुख हिस्सा असलेला घटक ठरला आहे. सन २०१८-१९ मध्ये वस्तु व सेवा कराचा महसूल ७७% वाढून सन २०१७-१८ मधील रू.५०,९७७ कोटी वरून रु. ९०,१४० कोटी इतका वाढण्याचा अंदाज आहे.

आलेख १.६: स्वत: कर महसूलाचा कल (रु. कोटी)




स्त्रोत: संबंधित वर्षातील लेखे आणि जमा व खर्चाची अंदाजपत्रके


**केंद्रीय करातील हिस्सा आणि सहाय्यक अनुदाने**

१३ व्या वित्त आयोगातील केंद्रीय करांचे वितरण ३२ % वरून १४ व्या वित्त आयोगामध्ये ४२ % इतके वाढविण्यात आले. यामुळे राज्य सरकारच्या केंद्रीय करातील हिस्स्यात लक्षणीय वाढ झाली आहे. राज्याला मिळणाऱ्या केंद्रीय करांच्या हिस्स्यात वाढ होऊन १३ व्या वित्त आयोगातील हिस्सा २.०२ % वरून १४ व्या वित्त आयोगामध्ये मध्ये २.५२ % झाला आहे.

**३.२.३ करेतर महसूल (Non Tax Revenue)**

व्याज, लाभांश, नफा, आर्थिक सेवा, सामान्य सेवा आणि सामाजिक सेवा हे करेतर महसूलाचे मुख्य घटक आहेत. या मध्ये सरासरी ४० % हिस्सा असलेल्या आर्थिक सेवा या घटकाचे महसूलात मुख्य योगदान आहे. व्याज, लाभांश आणि नफा यांचे राज्याच्या करेतरमहसूलात सुमारे २० % योगदान आहे. सन २००५-०६ मधील राज्याचा करेतर महसूल रू.५९३५ कोटी वरून सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पीय अंदाजानुसार रु.२२,७८५ कोटी इतका होणे अपेक्षित आहे. ही वाढ एकूण ४ पट आहे.

आलेख १.७: करेतर महसूल (रु. कोटी) आणि एकूण महसूलातील प्रमाण (%) (२००५-०६ ते २०१८-१९ चे अर्थसंकल्पीय अंदाज)





स्त्रोत: संबंधित वर्षांतील लेखे आणि जमा व खर्चाची अंदाजपत्रके

## ३.३ खर्चाचे व्यवस्थापन

सन २००५-०६ मध्ये राज्याचा एकूण खर्च रु. ७२, ३६२ कोटी इतका होता. त्यामध्ये १२ % वार्षिक चक्रवाढ दराने वाढ होऊन तो सन २०१७-१८ च्या सुधारित अंदाजानुसार रु.२,६९,३९२ कोटी इतका झाला आहे. सन २०१८-१९ मध्ये एकूण खर्चात मागील वर्षाच्या तुलनेत २५ % वाढ अपेक्षित असून सदर खर्च रु. ३,३८,८१९ कोटी इतकावाढ अपेक्षित आहे. राज्याच्या एकूण खर्चात महसूली खर्चाचे प्रमाण लक्षणीय आहे.

आलेख १.९: महसूली आणि भांडवली खर्चाचे सकल उत्पन्नाशी प्रमाण (%)




स्त्रोत: संबंधित वर्षांतील लेखे आणि जमा व खर्चाची अंदाजपत्रके

### ३.३.१ महसूली खर्च

गेल्या दशकात राज्याच्या एकूण खर्चातील महसूली खर्चाचे प्रमाण वाढले आहे. सन २००८-०९ मध्ये हे प्रमाण ७५.७ % होते. ते सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पीय अंदाजानुसार ८८.९% इतके झाले. विशेषत: सन २००९-१० ते २०१३-१४ दरम्यान वेतन, भत्ते व निवृत्तिवेतनावरील खर्चात तसेच सामाजिक सेवांवरील खर्चात झालेली वाढ हे यामागील प्रमुख कारण आहे. तथापि, वेतन व निवृत्तिवेतनावरील खर्चातील वाढ मंदावली असून त्याचे मुख्य कारण राज्य शासनाने सन २०१५ मध्ये नोकरभरतीवर मर्यादा आणली आणि नवीन निवृत्तिवेतन योजना लागू केली. दरम्यान शिक्षण आणि आरोग्यासारख्या सामाजिक सेवांवरील राज्याच्या खर्चात अल्प प्रमाणात वाढ झाली आहे.

### ३.३.२ बांधील खर्च

राज्याच्या एकूण महसूली उत्पन्नाच्या ५० % पेक्षा जास्त रक्कम वेतन, निवृत्तिवेतन आणि व्याज यावर खर्च होते. सन २०१८-१९ मध्ये ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशीच्या अंमलबजावणीमुळे वेतन व निवृत्तिवेतनावरील खर्चात वाढ अपेक्षित आहे.

राज्याचा वेतनावरील खर्च सन २०१७-१८ च्या सुधारित अंदाजानुसार रु.८३,८१४ कोटी इतका दर्शविण्यात आला होता. त्याचप्रमाणे सन २०१८-१९ मध्ये ७ व्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीनंतर रु. १,०२,६६८ कोटी इतका खर्च अपेक्षित धरुन तेवढी तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आलेली होती. त्याचप्रमाणे निवृत्तिवेतनावरील खर्च सन २०१७-१८ च्या सुधारित

अंदाजानुसार रु.२४,०२० कोटी दर्शविण्यात आला होता, सदर खर्चात ७ व्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीनंतर होणारी वाढ विचारात घेऊन सन २०१८-१९ मध्ये रु. २७,३७८ कोटी एवढी तरतुद करण्यात आली होती.


राज्याच्या विकास कामांसाठी तसेच पायाभूत सुविधांसाठी पुरेसा निधी उपलब्ध व्हावा याकरिता वेतन व भत्ते आणि निवृत्तिवेतनावरील खर्च आणि कर्जावरील व्याज मर्यादीत ठेवणे आवश्यक असते. ही बाब विचारात घेऊन राज्याने आर्थिक व्यवस्थापनाच्या विविध उपाययोजना वेळोवेळी केल्या आहेत. या उपाययोजनांमध्ये शासकीय कामकाजात तंत्रज्ञानाचा वापर, आवश्यक तेथे बाह्य यंत्रणेकडून काम करून घेणे, प्रशासकीय विभागांच्या आकृतीबंधात वस्तुनिष्ठ सुधारणा, पदांचे रूपांतरण, पदभरतीचे सुयोग्य विनियमन इ. चा समावेश आहे. पदभरतीचे विनियमन करताना विकास कामे आणि आवश्यक सेवांशी निगडीत पदे भरण्यास प्राधान्य देण्यात आले आहे.

सन २०१७-१८ मध्ये वेतनावरील एकूण खर्चाचे महसूली उत्पन्नाशी असलेले प्रमाण सुमारे ३३% आहे. हे राज्य शासनाने वेतनावरील खर्च मर्यादीत ठेवण्यासाठी योजलेल्या विविध उपाययोजनांचे फलित आहे.

भविष्यातील निवृत्तिवेतनाचे दायित्व मर्यादित ठेवण्यासाठी शासनाने दि. १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांसाठी नवीन निवृत्तिवेतन योजना, २००५ कार्यान्वित केली होती, जी परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना आहे. यामुळे येत्या काही वर्षांमध्ये निवृत्तिवेतनावरील खर्चात कपात होण्यास मदत होईल.

व्याजाच्या खर्चावरील नियंत्रण हे बांधील खर्चावर नियंत्रण ठेवण्याच्या उपाययोजनांपैकी एक आहे. एकूण महसूली उत्पन्नाशी व्याजावरील खर्चाचे असलेले प्रमाण सन २००९-१० मधील १७.०० % इतक्या उच्च प्रमाणावरून घटून सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पीय अंदाजानुसार ते १२.०० % पर्यंत खाली आले आहे; हे राज्याने अवलंबलेल्या चांगल्या कर्ज व्यवस्थापनाचे द्योतक आहे.

आलेख १.१० : वेतन, निवृत्तिवेतन आणि व्याजावरील खर्चाचे एकूण महसूली उत्पन्नाशी असलेल प्रमाण (२००८-०९ ते २०१८-१९-अर्थसंकल्पीय अंदाज)




स्रोत: संबंधित वर्षांतील लेखे आणि जमा व खर्चाची अंदाजपत्रके

### ३.३.३ भांडवली खर्च

गेल्या दशकात भांडवली खर्चाचा वेग महसूली खर्चाच्या तुलनेत कमी राहिला आहे. राज्याचा भांडवली खर्च सन २००५-०६ मधील रु.२०,०८२ कोटी वरून वार्षिक ४.४ % चक्रवाढ दराने वाढून सन २०१७-१८ च्या सुधारित अंदाजानुसार रु. ३३,६१४ कोटी इतका झाला आहे. भांडवली खर्चाचा हिस्सा सन २००८-०९ मधील २४ % वरून घटून सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पीय अंदाजानुसार ११ % वर आला आहे. तथापि, राज्य शासन नागरी स्थानिक स्वराज्य संस्था आणि पंचायती राज संस्थांना भांडवली स्वरुपाची मालमत्ता निर्माण करण्यासाठी मोठ्या प्रमाणात अनुदान देत आहे, हे विशेषत्वाने नमूद करण्यात येत आहे. हा खर्च राज्याच्या लेख्यांमध्ये योग्यरित्या महसूली खर्चाच्या स्वरूपात दर्शविला असला तरी त्यातून भांडवली मालमत्ता निर्माण होत आहे.

त्याशिवाय मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, शहर व औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ इत्यादींसारख्या मोठ्या निकायांच्या माध्यमातून पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी


रु.१ लक्ष कोटी पेक्षा अधिक गुंतवणूक होत आहे. मात्र हे राज्याच्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये प्रतिबिंबित होत नाही.

## ३.४ कर्ज व्यवस्थापन

सन २००५ ते २०१८ या कालावधीत कर्जाच्या संरचनेतील बदलामुळे राज्याच्या कर्जाच्या स्थितीत लक्षणीय सुधारणा दिसून आली आहे. सन २००५-०६ मध्ये राज्याच्या सकल उत्पन्नाशी असलेल कर्जाचे प्रमाण २५.५ % वरून सातत्यपूर्ण घटून सन २०१७-१८ च्या सुधारित अंदाजानुसार हे प्रमाण १६.५ % झाले आहे.

सन २०१७-१८ च्या अखेरीस उर्वरित कर्जाची व्याप्ती रु. ४,०६,८१२ कोटी होती. सन २०१८-१९ च्या अखेरपर्यंत त्यात वाढ होऊन ते रु. ४,६१,८०७ कोटी रुपये होणे अपेक्षित आहे. राज्याच्या कर्जाचे मुख्य घटक हे खुल्या बाजारातील कर्ज आणि राष्ट्रीय अल्पबचत निधी (NSSF) हे आहेत. सन २००५-२०१९ या कालावधीत खुल्या बाजारातील कर्ज रु. १९,७३९ कोटी (सकल उत्पन्नाच्या ४.१ %) वरून रु.३,०१,५८८ कोटी (सकल उत्पन्नाच्या १०.८ %) पर्यंत वाढणे अपेक्षित असून ही वाढ पंधरा पट आहे. उच्च व्याजदरामुळे राष्ट्रीय अल्प बचत निधीकडून राज्याने कर्ज घेणे टाळले आहे.


आलेख १.११: कर्जाचा कल (राज्याच्या सकल उत्पन्नाशी प्रमाण %)




स्त्रोत: संबंधित वर्षातील लेखे आणि जमा व खर्चाची अंदाजपत्रके

सन २००५-२०१७ दरम्यान नाबार्डकडून घेण्यात आलेल्या कर्जात २५% वार्षिक चक्रवाढ दराने वाढ झाली असून सन २०१७-१८ च्या सुधारित अंदाजानुसार ते रु. ८,९५६ कोटी आहे. सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पीय अंदाजानुसार त्यात वाढ होऊन ते रु. १२,२०७ कोटी होणे अपेक्षित आहे. नाबार्डकडून मोठ्या प्रमाणात कर्ज घेण्याचे एक प्रमुख कारण म्हणजे, ग्रामीण विकास प्रकल्पांसाठी विशेषतः शेतीशी संबंधित प्रकल्पासाठी राज्यांना अत्यंत अल्पदरात कर्ज पुरविण्यात येते.

आलेख **१.१२: कर्ज रचना (%, २०१७-१८)**




स्त्रोत: संबंधित वर्षांतील लेखे आणि जमा व खर्चाची अंदाजपत्रके

******

# प्रकरण ४ - राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या सुधारित वेतनश्रेण्यांबाबत शिफारशी

## ४.१ वेतन मॅट्रीक्स आधारीत सुधारित वेतनश्रेण्या :

केंद्रीय ७ व्या वेतन आयोगाने केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांकरिता सुधारित वेतनश्रेण्यांची शिफारस करताना ६ व्या वेतन आयोगातील वेतनबँड आणि ग्रेड वेतन एकत्रित करून वेतन मॅट्रीक्सची शिफारस केली आहे. या मध्ये ६ व्या वेतन आयोगातील एकूण ४ वेतनबँडमधील (वेतनबँड पीबी - १ ते पीबी - ४) १५ ग्रेड वेतने, आणि ४ उच्चस्तर वेतनश्रेण्या / नियत वेतनांसाठी समकक्ष १९ वेतन मॅट्रीक्स तयार केले आहेत व त्यांना स्तर (Level) असे संबोधण्यात आले आहे. केंद्र शासनाने त्यांच्या आस्थापनेवरील गट -ड मधील सर्व संवर्गातील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करून त्यांना गट - क मधील संवर्गामध्ये सामावून घेतले आहे आणि गट - ड ही वर्गवारी निरसित केली आहे. त्यामुळे आता ७ व्या आयोगात केंद्र शासनाकडे नियमित आस्थापनेवर गट- क मधील संवर्ग हा सर्वात निम्नस्तर संवर्ग आहे. परिणामी केंद्र शासनाने ७ व्या वेतन आयोगात गट- क व त्यापुढील संवर्गासाठी सुधारित वेतन मॅट्रिक्स विहित केले आहे. केंद्र शासनाच्या वेतन मॅट्रिक्समध्ये किमान वेतन रु. १८०००/- तर कमाल वेतन रु. २५००००/- (नियत) इतके निश्चित केले आहे.

मात्र राज्य शासनाकडे गट- ड संवर्ग निरसित केला नसल्याने शिफारस करण्यात येत असलेल्या वेतन मॅट्रिक्समध्ये किमान वेतन रु. १५०००/- इतके निश्चित केले आहे. गट - क मधील किमान वेतन केंद्र शासनाप्रमाणे रु. १८०००/- ठेवण्यात आले आहे.

केंद्र शासनाने ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशींनुसार स्वीकारलेली वेतन मॅट्रीक्स संरचना राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांकरिता दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून लागू करण्याची समिती शिफारस करीत आहे. राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांकरिता सुधारित वेतनश्रेण्यांची शिफारस करताना केंद्र शासन आणि राज्य शासनाकडे ६ व्या वेतन

आयोगातील ज्या वेतनसंरचना समान आहेत, त्यांच्याकरिता समितीने केंद्र शासनाकडील वेतन मॅट्रिक्स विचारात घेतले आहेत. त्याव्यतिरिक्त राज्य शासनाकडे असलेल्या इतर असुधारित वेतनसंरचनांसाठी सुधारित वेतन मॅट्रिक्स विहित करताना त्या-त्या वेतनबँडसाठी केंद्र शासनाने विचारात घेतलेले सूत्र अनुसरण्यात आले आहे.

वर नमूद केल्याप्रमाणे केंद्र शासनाकडे गट - ड संवर्ग नसल्याने त्यासाठी सुधारित वेतन मॅट्रिक्स विहित केलेले नाही. राज्य शासनाकडे गट - ड संवर्ग अस्तित्वात असल्याने समितीने या संवर्गांच्या विद्यमान -१एस या वेतनबँडमधील वेतनसंरचनेकरिता सुधारित वेतन मॅट्रिक्स विहित करताना किमान वेतन रु. १५००० राहील, ही बाब समितीने विचारात घेतली आहे.

## ४.२ असुधारित वेतनसंरचनांचे विलिनीकरण

४.२.१ केंद्र तसेच राज्य शासनाकडे ५ व्या आणि ६ व्या वेतन आयोगात वेतनश्रेण्यांची संख्या कमी करण्याचा सर्वसाधारण कल दिसून आला आहे. राज्य शासनाकडे ४ थ्या वेतन आयोगात वेतनश्रेण्यांची संख्या ३४ इतकी होती. ही संख्या ५ व्या वेतन आयोगात २७ पर्यंत कमी करण्यात आली. मात्र ६ व्या वेतन आयोगात वेतनबँड - १ एस ते पीबी -४ मधील ३७ ग्रेड वेतने आणि रु. ६७०००-७५००० ही वेतनश्रेणी मिळून वेतनश्रेण्यांची संख्या पुन्हा ३८ पर्यंत वाढली आहे; त्याची प्रामुख्याने पुढील तीन कारणे दिसून येतात :-

(अ) पदोन्नतीचा संवर्ग आणि निम्न संवर्गास एकच वेतन संरचना अनुज्ञेय झाल्यामुळे पदोन्नतीच्या संवर्गास अतिरिक्त ग्रेड वेतन मंजूर करण्यात आले. सदर अतिरिक्त ग्रेड वेतन संबंधित संवर्गाच्या वेतन संरचनेसोबत स्वतंत्रपणे न दर्शविता संबंधित संवर्गाच्या वेतन संरचनेतील ग्रेड वेतनातच समाविष्ठ करुन एकत्रित ग्रेड वेतन दर्शविले होते. त्यामुळे वेतनश्रेण्यांची संख्या वाढलेली दिसून येते. (५ व्या वेतन आयोगात अशा प्रकरणी पदोन्नतीच्या पदास मंजूर केलेले विशेष वेतन वेतनश्रेणीसोबत स्वतंत्रपणे दर्शविले होते. त्यामुळे त्याचा वेतनश्रेण्यांच्या संख्येवर परिणाम झाला नाही.)

(ब) ६ व्या वेतन आयोगाची अंमलबजावणी होण्यापूर्वी काही विभागांमधील संवर्गांच्या ५ व्या वेतन आयोगातील वेतनश्रेण्या पुन:सुधारित करण्यात आल्या होत्या. परंतु अशा संवर्गांना ६ व्या वेतन आयोगात पुन:सुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्ष वेतन संरचना मंजूर करणे समर्थनीय नसल्यामुळे मूळ वेतनश्रेण्यांशी समकक्ष वेतन संरचनेतील ग्रेड वेतनापेक्षा थोडे जास्त ग्रेड वेतन मंजूर करण्यात आले होते. वास्तविक पुन:सुधारणेपूर्वीच्या मूळ वेतनश्रेण्या विचारात घेऊन ६ व्या वेतन आयोगात समकक्ष वेतन संरचना मंजूर करणे उचित ठरले असते.

(क) काही मुख्याध्यापक संवर्गांना प्रशासकीय कामकाज हाताळण्याच्या अनुषंगाने ५ व्या वेतन आयोगात विशेष वेतन मंजूर करण्यात आले होते तर ६ व्या वेतन आयोगात या विशेष वेतनाऐवजी अतिरिक्त ग्रेड वेतन मंजूर करण्यात आले होते.

४.२.२. वरील (अ), (ब) आणि (क) या परिच्छेदांत नमूद केलेल्या कारणांमुळे वेतनबँड पीबी - १: रु. ५२००-२०२०० मध्ये रु. २५००, रु. २९००, रु. ३,००० वेतनबँड पीबी - २: रु. ९३००-३४८०० मध्ये रु. ४१००, रु. ४५००, रु. ४७००, रु. ४९००, वेतनबँड पीबी - ३ : रु. १५६००-३९१०० मध्ये रु. ५७००, रु. ५८००, रू. ६९००, रू. ७९०० आणि वेतनबँड पीबी - ४: रु. ३७४००-६७००० मध्ये रु. ८८०० ही ५ व्या वेतन आयोगातील कोणत्याही वेतनश्रेणीशी समकक्ष नसलेली ग्रेड वेतने नव्याने निर्माण केली होती. सदर ग्रेड वेतने ५ व्या वेतन आयोगातील कोणत्याही वेतनश्रेणीशी समकक्ष नव्हती, ही बाब राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ (हकीम समिती) च्या अहवालातील परिच्छेद ३.२.१ मधील तक्ता क्र. ३.१ वरुन स्पष्ट होते.

४.२.३. आता ७ व्या वेतन आयोगात सुधारित वेतन मॅट्रिक्समधील दोन स्तरांमध्ये पुरेसा फरक रहावा हा दृष्टीकोन ठेवून, तसेच वर नमूद ग्रेड वेतने आधारभूत मानून व काही वेतन संरचनांचे (ग्रेड वेतनांचे) विलिनीकरण करुन त्यांना सुधारित वेतन मॅट्रिक्समध्ये समकक्ष स्तराची शिफारस करण्यात येत आहे.

४.२.४. वरील पार्श्वभूमीवर असुधारित वेतन संरचनांचे विलिनीकरण पुढीलप्रमाणे करण्यात आले आहे:-

(१) वेतनबँड -१एस + ग्रेड वेतन रु. १६५० ही वेतन संरचना वेतनबँड -१एस + ग्रेड वेतन रु. १७०० या वेतन संरचनेत विलिन केली आहे.

(२) वेतनबँड पीबी - १ + ग्रेड वेतन रु. २९०० ही वेतन संरचना वेतनबँड — पीबी- १ + ग्रेड वेतन रु. ३००० या वेतन संरचनेत विलिन केली आहे.

(३) वेतनबँड पीबी - २ + ग्रेड वेतन रु. ४१०० ही वेतन संरचना वेतनबँड पीबी - २ + ग्रेड वेतन रु. ४२०० या वेतन संरचनेत विलिन केली आहे.

(४) वेतनबँड पीबी - २ + ग्रेड वेतन रु. ४५०० ही वेतन संरचना वेतनबँड पीबी - २ + ग्रेड वेतन रु. ४६०० या वेतन संरचनेत विलिन केली आहे.

(५) वेतनबँड पीबी - २ + ग्रेड वेतन रु. ४९०० ही वेतन संरचना वेतनबँड पीबी - २ + ग्रेड वेतन रु. ५००० या वेतन संरचनेत विलिन केली आहे.

(६) वेतनबँड पीबी - २ + ग्रेड वेतन रु. ५४०० ही वेतन संरचना वेतनबँड पीबी - ३ + ग्रेड वेतन रु. ५४०० या वेतन संरचनेत विलिन केली आहे.

(७) वेतनबँड पीबी - ३ + ग्रेड वेतन रु. ५७०० ही वेतन संरचना वेतनबँड पीबी - ३ + ग्रेड वेतन रु. ५८०० या वेतन संरचनेत विलिन केली आहे.

**४.३ वेतनबँड पीबी -२: रु. ९३००-३४८०० + ग्रेड वेतन रु.४३००, रु.४४००, या वेतनसंरचनांकरिता सुधारित वेतन स्तर**

केंद्र शासनाने ६ वेतन आयोगात सुधारित वेतनसंरचना विहित करताना ५ व्या वेतन आयोगातील रु. ५००० - ८०००, रु. ५५००-९००० आणि रु. ६५०० - १०५०० या तीन वेतनश्रेण्यांसाठी वेतनबँड पीबी -२: रु. ९३०० - ३४८०० + ग्रेड वेतन रु. ४२०० ही एकच वेतनसंरचना मंजूर केली होती.

परंतु ५ व्या वेतन आयोगामध्ये राज्य शासनाकडे या तीन वेतनश्रेण्यांच्याबाबतीत पुढीलप्रमाणे स्थिती होती :-

(अ) रू. ५५००-९००० या वेतनश्रेणीतील काही पदे रु. ५०००-८००० या वेतनश्रेणीतील पदांच्या पदोन्नतीची पदे होती.

(ब) रु. ६५००-१०५०० या वेतनश्रेणीतील काही पदे रु. ५०००-८००० या वेतनश्रेणीतील पदांच्या पदोन्नतीची पदे होती तसेच

(क) रु. ६५००-१०५०० या वेतनश्रेणीतील काही पदे रु. ५५००-९००० या वेतनश्रेणीतील पदांच्या पदोन्नतीची पदे होती.

वरील पार्श्वभूमीवर या तीनही वेतनश्रेण्यांसाठी **वेतनबँड पीबी - २ : रु. ९३०० - ३४८०० + ग्रेड वेतन रु. ४२०० ही एकच** वेतनसंरचना जशीच्या तशी राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत लागू केल्यास त्याची अंमलबजावणी करताना प्रशासकीय अडचणी उद्भवू शकतील, असे मत राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ ने (हकीम समिती) नोंदवून ६ व्या वेतन आयोगात रु. ५०००-८००० या वेतनश्रेणीसाठी वेतनबँड पीबी - २: रु. ९३०० - ३४८०० + ग्रेड वेतन रु. ४२०० या वेतन संरचनेची तर रु. ५५००-९००० आणि रु. ६५००-१०५०० या वेतनश्रेण्यांसाठी वेतनबँड पीबी - २ आणि अनुक्रमे रु. ४३०० व रु. ४४०० अशा दोन वेतन संरचनांची शिफारस केली होती. सदर शिफारस शासनाने स्वीकारली होती.

वरीलप्रमाणे वेतनसंरचना विहित केल्यामुळे निम्न पद व पदोन्नतीच्या पदाच्या वेतनसंरचनेमध्ये पुरेसा फरक नसल्याची कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र भावना निर्माण झाल्याचे विविध संघटनांनी चर्चेदरम्यान या समितीच्या विशेषत्वाने निदर्शनास आणून, ७ व्या वेतन आयोगात सुधाारित वेतनश्रेण्यांची शिफारस करताना ही बाब विचारात घेण्याची आग्रही मागणी केली होती.

या मागणीबाबत विचार करताना वरील वेतनसंरचनांतील विविध विभागांमधील विविध संवर्ग, यात समाविष्ट असलेला गट- ब संवर्ग, विविध संवर्गांचे प्रशासनिक स्थान

आणि या संवर्गांशी निगडीत कर्तव्ये व जबाबदाऱ्यांचा समितीने साकल्याने विचार केला आहे. वेतनबँड पीबी- २ आणि ग्रेड वेतन रु. ४२००, रु. ४३००, रु. ४४०० व रु. ४६०० या वेतनसंरचनांशी समरूप ७ व्या वेतन आयोगाच्या वेतन मॅट्रिक्समधील स्तरांमध्ये पुरेसा फरक राहील याची विशेष दक्षता घेण्यात आली आहे. त्यानुषंगाने वेतनबँड पीबी - २ आणि ग्रेड वेतन रु. ४३०० व रु. ४४०० या वेतनसंरचनांकरिता सुधारित वेतन मॅट्रिक्समध्ये स्तर विहित करताना त्यामध्ये पुरेसा फरक ठेवण्यात आलेला आहे. तसेच वेतनबँड पीबी-२ आणि ग्रेड वेतन रु. ४४०० व रु. ४६०० बाबतही सुधारित वेतन मॅट्रिक्समधील स्तरांमध्ये पुरेसा फरक ठेवण्यात आला आहे.

**४.४** वेतनबँड पीबी - २ : रु. ९३००-३४८०० + ग्रेड वेतन रु. ५४०० या वेतन संरचनेस सुधारित वेतन मॅट्रिक्समध्ये वेतन स्तर मंजूर करणे

राज्य शासनाकडील गट-ब/तत्कालीन वर्ग-२ मधील काही संवर्गांना ४ थ्या तसेच ५ व्या वेतन आयोगात गट-अ/तत्कालीन वर्ग-१ संवर्गास अनुज्ञेय असलेल्या अनुक्रमे रु. २२००-४००० आणि रु. ८०००-१३५०० या वेतनश्रेण्या मंजूर केल्या होत्या. संबंधित संवर्गात नियुक्तीसाठीची शैक्षणिक अर्हता अथवा त्या संवर्गातील सेवेचा विशिष्ट कालावधी अथवा त्या संवर्गाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या इत्यादी बाबी विचारात घेऊन सदर संवर्गास गट-अ/तत्कालीन वर्ग-१ संवर्गास अनुज्ञेय वेतनश्रेणीचा लाभ देण्याच्या उद्देशाने सदर वेतनश्रेण्या मंजूर करण्यात आल्या होत्या, असे दिसून येते.

तथापि, ६ व्या वेतन आयोगात केंद्र शासनाने रु. ८०००-१३५०० या वेतनश्रेणीतील गट-अ संवर्गांसाठी वेतनबँड पीबी - ३ : रु. १५६००-३९१०० + ग्रेड वेतन रु. ५४०० तर गट-ब संवर्गांसाठी वेतनबँड पीबी - २ : रु. ९३०० + ग्रेड वेतन रु. ५४०० ही वेतन संरचना मंजूर केली होती. राज्य शासनाने देखील अशाचप्रकारे वेतन संरचना मंजूर केल्या होत्या. परंतु गट-ब/तत्कालीन वर्ग-२ मधील संवर्गांना जाणीवपूर्वक गट-अ/तत्कालीन वर्ग-१ संवर्गास अनुज्ञेय

असलेली वेतनश्रेणी मंजूर करण्याचा उद्देश सफल होत नसल्याने ६ व्या वेतन आयोगाच्या अमलबजावणीनंतर नियुक्त केलेल्या वेतनत्रुटी निवारण समितीच्या शिफारशीनुसार रु. ८०००- १३५०० या वेतनश्रेणीतील गट-ब संवर्गास वेतनबँड पीबी - ३ : रु. १५६००-३९१०० + ग्रेड वेतन रु. ५४०० ही वेतन संरचना मंजूर केली आहे. ज्या संवर्गांचे या संबंधीचे प्रस्ताव वेतनत्रुटी समितीच्या विचारार्थ सादर झाले नव्हते, त्या संवर्गांना मात्र वेतनबँड पीबी - ३: रु. १५६००-३९१०० + ग्रेड वेतन रु. ५४०० या वेतन संरचनेचा लाभ मिळू शकला नाही.

वेतनत्रुटी समितीने स्वीकारलेला दृष्टीकोन योग्य वाटत असल्याने आता समिती वेतनबँड पीबी - ३ : रु. १५६००-३९१०० + ग्रेड वेतन रु. ५४०० आणि वेतनबँड पीबी - २ : रु. ९३०० + ग्रेड वेतन रु. ५४०० या असुधारित वेतन संरचनांसाठी सुधारित वेतन मॅट्रिक्समध्ये एकच स्तर एस -२० ची शिफारस करत आहे.

## ४.५ सुधारित वेतन मॅट्रिक्स

वरील परिच्छेदांमधील विवेचन विचारात घेऊन ६ व्या वेतन आयोगातील विद्यमान वेतन संरचनांसाठी पुढील तक्ता क्र. ४.१ मधील सुधारित वेतन मॅट्रिक्सची शिफारस करण्यात येत आहे.

सर्व राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून त्यांच्या विद्यमान वेतनसंरचनांशी समकक्ष वेतन स्तर मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

मात्र परिच्छेद ४.६ मध्ये नमूद संवर्गांच्या बाबतीत त्या परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे वेतन स्तर मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**तक्ता क्र. ४.१ : राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांसाठी सुधारित वेतन मॅट्रिक्स**

| | वेतनबँड -१एस: रु. ४४४०-७४४० | | | | | वेतनबँड - पीबी १: रु. ५२००-२०२०० | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| ग्रेड वेतन | १३०० | १४०० | १६०० | १६५० | १७०० | १८०० | १९०० | २००० | २४०० | २५०० | २८०० |
| थेट नियुक्ती चे वेतनबँड मधील वेतन | ४४४० | ४४४० | ४८४० | ४९२० | ४९२० | ५२०० | ५८३० | ६४६० | ७५१० | ७७७० | ८५६० |
| विलिनी -करण | | | | १७०० | | | | | | | |
| थेट नियुक्ती चे एकूण वेतन | ५७४० | ५८४० | ६४४० | ६५७० | ६६२० | ७००० | ७७३० | ८४६० | ९९१० | १०२७० | ११३६० |
| स्तर | एस-१ | एस-२ | एस-३ | विलिन | एस-४ | एस-५ | एस-६ | एस-७ | एस-८ | एस-९ | एस-१० |
| १ | १५००० | १५३०० | १६६०० | विलिन | १७१०० | १८००० | १९९०० | २१७०० | २५५०० | २६४०० | २९२०० |
| २ | १५५०० | १५८०० | १७१०० | विलिन | १७६०० | १८५०० | २०५०० | २२४०० | २६३०० | २७२०० | ३०१०० |
| ३ | १६००० | १६३०० | १७६०० | विलिन | १८१०० | १९१०० | २११०० | २३१०० | २७१०० | २८००० | ३१००० |
| ४ | १६५०० | १६८०० | १८१०० | विलिन | १८६०० | १९७०० | २१७०० | २३८०० | २७९०० | २८८०० | ३१९०० |
| ५ | १७००० | १७३०० | १८६०० | विलिन | १९२०० | २०३०० | २२४०० | २४५०० | २८७०० | २९७०० | ३२९०० |
| ६ | १७५०० | १७८०० | १९२०० | विलिन | १९८०० | २०९०० | २३१०० | २५२०० | २९६०० | ३०६०० | ३३९०० |
| ७ | १८००० | १८३०० | १९८०० | विलिन | २०४०० | २१५०० | २३८०० | २६००० | ३०५०० | ३१५०० | ३४९०० |
| ८ | १८५०० | १८८०० | २०४०० | विलिन | २१००० | २२१०० | २४५०० | २६८०० | ३१४०० | ३२४०० | ३५९०० |
| ९ | १९१०० | १९४०० | २१००० | विलिन | २१६०० | २२८०० | २५२०० | २७६०० | ३२३०० | ३३४०० | ३७००० |
| १० | १९७०० | २०००० | २१६०० | विलिन | २२२०० | २३५०० | २६००० | २८४०० | ३३३०० | ३४४०० | ३८१०० |
| ११ | २०३०० | २०६०० | २२२०० | विलिन | २२९०० | २४२०० | २६८०० | २९३०० | ३४३०० | ३५४०० | ३९२०० |
| १२ | २०९०० | २१२०० | २२९०० | विलिन | २३६०० | २४९०० | २७६०० | ३०२०० | ३५३०० | ३६५०० | ४०४०० |
| १३ | २१५०० | २१८०० | २३६०० | विलिन | २४३०० | २५६०० | २८४०० | ३११०० | ३६४०० | ३७६०० | ४१६०० |
| १४ | २२१०० | २२५०० | २४३०० | विलिन | २५००० | २६४०० | २९३०० | ३२००० | ३७५०० | ३८७०० | ४२८०० |
| १५ | २२८०० | २३२०० | २५००० | विलिन | २५८०० | २७२०० | ३०२०० | ३३००० | ३८६०० | ३९९०० | ४४१०० |
| १६ | २३५०० | २३९०० | २५८०० | विलिन | २६६०० | २८००० | ३११०० | ३४००० | ३९८०० | ४११०० | ४५४०० |
| १७ | २४२०० | २४६०० | २६६०० | विलिन | २७४०० | २८८०० | ३२००० | ३५००० | ४१००० | ४२३०० | ४६८०० |
| १८ | २४९०० | २५३०० | २७४०० | विलिन | २८२०० | २९७०० | ३३००० | ३६१०० | ४२२०० | ४३६०० | ४८२०० |
| १९ | २५६०० | २६१०० | २८२०० | विलिन | २९००० | ३०६०० | ३४००० | ३७२०० | ४३५०० | ४४९०० | ४९६०० |
| २० | २६४०० | २६९०० | २९००० | विलिन | २९९०० | ३१५०० | ३५००० | ३८३०० | ४४८०० | ४६२०० | ५११०० |
| २१ | २७२०० | २७७०० | २९९०० | विलिन | ३०८०० | ३२४०० | ३६१०० | ३९४०० | ४६१०० | ४७६०० | ५२६०० |
| २२ | २८००० | २८५०० | ३०८०० | विलिन | ३१७०० | ३३४०० | ३७२०० | ४०६०० | ४७५०० | ४९००० | ५४२०० |
| २३ | २८८०० | २९४०० | ३१७०० | विलिन | ३२७०० | ३४४०० | ३८३०० | ४१८०० | ४८९०० | ५०५०० | ५५८०० |
| २४ | २९७०० | ३०३०० | ३२७०० | विलिन | ३३७०० | ३५४०० | ३९४०० | ४३१०० | ५०४०० | ५२००० | ५७५०० |
| २५ | ३०६०० | ३१२०० | ३३७०० | विलिन | ३४७०० | ३६५०० | ४०६०० | ४४४०० | ५१९०० | ५३६०० | ५९२०० |
| २६ | ३१५०० | ३२१०० | ३४७०० | विलिन | ३५७०० | ३७६०० | ४१८०० | ४५७०० | ५३५०० | ५५२०० | ६१००० |
| २७ | ३२४०० | ३३१०० | ३५७०० | विलिन | ३६८०० | ३८७०० | ४३१०० | ४७१०० | ५५१०० | ५६९०० | ६२८०० |
| २८ | ३३४०० | ३४१०० | ३६८०० | विलिन | ३७९०० | ३९९०० | ४४४०० | ४८५०० | ५६८०० | ५८६०० | ६४७०० |
| २९ | ३४४०० | ३५१०० | ३७९०० | विलिन | ३९००० | ४११०० | ४५७०० | ५०००० | ५८५०० | ६०४०० | ६६६०० |
| ३० | ३५४०० | ३६२०० | ३९००० | विलिन | ४०२०० | ४२३०० | ४७१०० | ५१५०० | ६०३०० | ६२२०० | ६८६०० |
| ३१ | ३६५०० | ३७३०० | ४०२०० | विलिन | ४१४०० | ४३६०० | ४८५०० | ५३००० | ६२१०० | ६४१०० | ७०७०० |
| ३२ | ३७६०० | ३८४०० | ४१४०० | विलिन | ४२६०० | ४४९०० | ५०००० | ५४६०० | ६४००० | ६६००० | ७२८०० |
| ३३ | ३८७०० | ३९६०० | ४२६०० | विलिन | ४३९०० | ४६२०० | ५१५०० | ५६२०० | ६५९०० | ६८००० | ७५००० |
| ३४ | ३९९०० | ४०८०० | ४३९०० | विलिन | ४५२०० | ४७६०० | ५३००० | ५७९०० | ६७९०० | ७०००० | ७७३०० |
| ३५ | ४११०० | ४२००० | ४५२०० | विलिन | ४६६०० | ४९००० | ५४६०० | ५९६०० | ६९९०० | ७२१०० | ७९६०० |
| ३६ | ४२३०० | ४३३०० | ४६६०० | विलिन | ४८००० | ५०५०० | ५६२०० | ६१४०० | ७२००० | ७४३०० | ८२००० |
| ३७ | ४३६०० | ४४६०० | ४८००० | विलिन | ४९४०० | ५२००० | ५७९०० | ६३२०० | ७४२०० | ७६५०० | ८४५०० |
| ३८ | ४४९०० | ४५९०० | ४९४०० | विलिन | ५०९०० | ५३६०० | ५९६०० | ६५१०० | ७६४०० | ७८८०० | ८७००० |

| तक्ता क्र. ४.१ : राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांसाठी सुधारित वेतन मॅट्रिक्स | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | वेतनबँड -१एस: रु. ४४४०-७४४० | | | | | वेतनबँड - पीबी १: रु. ५२००-२०२०० | | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| ग्रेड वेतन | १३०० | १४०० | १६०० | १६५० | १७०० | १८०० | १९०० | २००० | २४०० | २५०० | २८०० |
| थेट नियुक्तीचे वेतनबँड मधील वेतन | ४४४० | ४४४० | ४८४० | ४९२० | ४९२० | ५२०० | ५८३० | ६४६० | ७५१० | ७७७० | ८५६० |
| विलिनी-करण | | | | १७०० | | | | | | | |
| थेट नियुक्तीचे एकूण वेतन | ५७४० | ५८४० | ६४४० | ६५७० | ६६२० | ७००० | ७७३० | ८४६० | ९९१० | १०२७० | ११३६० |
| स्तर | एस-१ | एस-२ | एस-३ | विलिन | एस-४ | एस-५ | एस-६ | एस-७ | एस-८ | एस-९ | एस-१० |
| ३९ | ४६२०० | ४७३०० | ५०९०० | विलिन | ५२४०० | ५५२०० | ६१४०० | ६७१०० | ७८७०० | ८१२०० | ८९६०० |
| ४० | ४७६०० | ४८७०० | ५२४०० | विलिन | ५४००० | ५६९०० | ६३२०० | ६९१०० | ८११०० | ८३६०० | ९२३०० |

| तक्ता क्र. ४.१ : राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांसाठी सुधारित वेतन मॅट्रिक्स | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वेतनबँड - पीबी १: रु. ५२००-२०२०० | | | | वेतनबँड - पीबी २ : रु.९३००-३४८०० | | | | | | | | |
| | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ |
| ग्रेड वेतन | २९०० | ३००० | ३५०० | ४१०० | ४२०० | ४३०० | ४४०० | ४५०० | ४६०० | ४८०० | ४९०० | ५००० |
| थेट नियुक्तीचे वेतनबँड मधील वेतन | ८६२० | ८६८० | ८९२० | ९३०० | ९३०० | १०१०० | १०९०० | ११७०० | १२५४० | १३३५० | १३६३० | १३७१० |
| विलिनी-करण | ३००० | | | ४२०० | | | | ४६०० | | | ५००० | |
| थेट नियुक्तीचे एकूण वेतन | ११५२० | ११६८० | १२४२० | १३४०० | १३५०० | १४४०० | १५३०० | १६२०० | १७१४० | १८१५० | १८५३० | १८७१० |
| स्तर | विलिन | एस-११ | एस-१२ | विलिन | एस-१३ | एस-१४ | एस-१५ | विलिन | एस-१६ | एस-१७ | विलिन | एस-१८ |
| १ | विलिन | ३०१०० | ३२००० | विलिन | ३५४०० | ३८६०० | ४१८०० | विलिन | ४४९०० | ४७६०० | विलिन | ४९१०० |
| २ | विलिन | ३१००० | ३३००० | विलिन | ३६५०० | ३९८०० | ४३१०० | विलिन | ४६२०० | ४९००० | विलिन | ५०६०० |
| ३ | विलिन | ३१९०० | ३४००० | विलिन | ३७६०० | ४१००० | ४४४०० | विलिन | ४७६०० | ५०५०० | विलिन | ५२१०० |
| ४ | विलिन | ३२९०० | ३५००० | विलिन | ३८७०० | ४२२०० | ४५७०० | विलिन | ४९००० | ५२००० | विलिन | ५३७०० |
| ५ | विलिन | ३३९०० | ३६१०० | विलिन | ३९९०० | ४३५०० | ४७१०० | विलिन | ५०५०० | ५३६०० | विलिन | ५५३०० |
| ६ | विलिन | ३४९०० | ३७२०० | विलिन | ४११०० | ४४८०० | ४८५०० | विलिन | ५२००० | ५५२०० | विलिन | ५७००० |
| ७ | विलिन | ३५९०० | ३८३०० | विलिन | ४२३०० | ४६१०० | ५०००० | विलिन | ५३६०० | ५६९०० | विलिन | ५८७०० |
| ८ | विलिन | ३७००० | ३९४०० | विलिन | ४३६०० | ४७५०० | ५१५०० | विलिन | ५५२०० | ५८६०० | विलिन | ६०५०० |
| ९ | विलिन | ३८१०० | ४०६०० | विलिन | ४४९०० | ४८९०० | ५३००० | विलिन | ५६९०० | ६०४०० | विलिन | ६२३०० |
| १० | विलिन | ३९२०० | ४१८०० | विलिन | ४६२०० | ५०४०० | ५४६०० | विलिन | ५८६०० | ६२२०० | विलिन | ६४२०० |
| ११ | विलिन | ४०४०० | ४३१०० | विलिन | ४७६०० | ५१९०० | ५६२०० | विलिन | ६०४०० | ६४१०० | विलिन | ६६१०० |
| १२ | विलिन | ४१६०० | ४४४०० | विलिन | ४९००० | ५३५०० | ५७९०० | विलिन | ६२२०० | ६६००० | विलिन | ६८१०० |
| १३ | विलिन | ४२८०० | ४५७०० | विलिन | ५०५०० | ५५१०० | ५९६०० | विलिन | ६४१०० | ६८००० | विलिन | ७०१०० |
| १४ | विलिन | ४४१०० | ४७१०० | विलिन | ५२००० | ५६८०० | ६१४०० | विलिन | ६६००० | ७०००० | विलिन | ७२२०० |

## तक्ता क्र. ४.१ : राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांसाठी सुधारित वेतन मॅट्रिक्स

| | वेतनबँड - पीबी १: रु. ५२००-२०२०० | | | वेतनबँड - पीबी २ : रु.९३००-३४८०० | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ |
| ग्रेड वेतन | २९०० | ३००० | ३५०० | ४१०० | ४२०० | ४३०० | ४४०० | ४५०० | ४६०० | ४८०० | ४९०० | ५००० |
| थेट नियुक्तीचे वेतनबँड मधील वेतन | ८६२० | ८६८० | ८९२० | ९३०० | ९३०० | १०१०० | १०९०० | ११७०० | १२५४० | १३३५० | १३६३० | १३७१० |
| विलिनी-करण | ३००० | | | ४२०० | | | | ४६०० | | | ५००० | |
| थेट नियुक्तीचे एकूण वेतन | ११५२० | ११६८० | १२४२० | १३४०० | १३५०० | १४४०० | १५३०० | १६२०० | १७१४० | १८१५० | १८५३० | १८७१० |
| स्तर | विलिन | एस-११ | एस-१२ | विलिन | एस-१३ | एस-१४ | एस-१५ | विलिन | एस-१६ | एस-१७ | विलिन | एस-१८ |
| १५ | विलिन | ४५४०० | ४८५०० | विलिन | ५३६०० | ५८५०० | ६३२०० | विलिन | ६८००० | ७२१०० | विलिन | ७४४०० |
| १६ | विलिन | ४६८०० | ५०००० | विलिन | ५५२०० | ६०३०० | ६५१०० | विलिन | ७०००० | ७४३०० | विलिन | ७६६०० |
| १७ | विलिन | ४८२०० | ५१५०० | विलिन | ५६९०० | ६२१०० | ६७१०० | विलिन | ७२१०० | ७६५०० | विलिन | ७८९०० |
| १८ | विलिन | ४९६०० | ५३००० | विलिन | ५८६०० | ६४००० | ६९१०० | विलिन | ७४३०० | ७८८०० | विलिन | ८१३०० |
| १९ | विलिन | ५११०० | ५४६०० | विलिन | ६०४०० | ६५९०० | ७१२०० | विलिन | ७६५०० | ८१२०० | विलिन | ८३७०० |
| २० | विलिन | ५२६०० | ५६२०० | विलिन | ६२२०० | ६७९०० | ७३३०० | विलिन | ७८८०० | ८३६०० | विलिन | ८६२०० |
| २१ | विलिन | ५४२०० | ५७९०० | विलिन | ६४१०० | ६९९०० | ७५५०० | विलिन | ८१२०० | ८६१०० | विलिन | ८८८०० |
| २२ | विलिन | ५५८०० | ५९६०० | विलिन | ६६००० | ७२००० | ७७८०० | विलिन | ८३६०० | ८८७०० | विलिन | ९१५०० |
| २३ | विलिन | ५७५०० | ६१४०० | विलिन | ६८००० | ७४२०० | ८०१०० | विलिन | ८६१०० | ९१४०० | विलिन | ९४२०० |
| २४ | विलिन | ५९२०० | ६३२०० | विलिन | ७०००० | ७६४०० | ८२५०० | विलिन | ८८७०० | ९४१०० | विलिन | ९७००० |
| २५ | विलिन | ६१००० | ६५१०० | विलिन | ७२१०० | ७८७०० | ८५००० | विलिन | ९१४०० | ९६९०० | विलिन | ९९९०० |
| २६ | विलिन | ६२८०० | ६७१०० | विलिन | ७४३०० | ८११०० | ८७६०० | विलिन | ९४१०० | ९९८०० | विलिन | १०२९०० |
| २७ | विलिन | ६४७०० | ६९१०० | विलिन | ७६५०० | ८३५०० | ९०२०० | विलिन | ९६९०० | १०२८०० | विलिन | १०६००० |
| २८ | विलिन | ६६६०० | ७१२०० | विलिन | ७८८०० | ८६००० | ९२९०० | विलिन | ९९८०० | १०५९०० | विलिन | १०९२०० |
| २९ | विलिन | ६८६०० | ७३३०० | विलिन | ८१२०० | ८८६०० | ९५७०० | विलिन | १०२८०० | १०९१०० | विलिन | ११२५०० |
| ३० | विलिन | ७०७०० | ७५५०० | विलिन | ८३६०० | ९१३०० | ९८६०० | विलिन | १०५९०० | ११२४०० | विलिन | ११५९०० |
| ३१ | विलिन | ७२८०० | ७७८०० | विलिन | ८६१०० | ९४००० | १०१६०० | विलिन | १०९१०० | ११५८०० | विलिन | ११९४०० |
| ३२ | विलिन | ७५००० | ८०१०० | विलिन | ८८७०० | ९६८०० | १०४६०० | विलिन | ११२४०० | ११९३०० | विलिन | १२३००० |
| ३३ | विलिन | ७७३०० | ८२५०० | विलिन | ९१४०० | ९९७०० | १०७७०० | विलिन | ११५८०० | १२२९०० | विलिन | १२६७०० |
| ३४ | विलिन | ७९६०० | ८५००० | विलिन | ९४१०० | १०२७०० | ११०९०० | विलिन | ११९३०० | १२६६०० | विलिन | १३०५०० |
| ३५ | विलिन | ८२००० | ८७६०० | विलिन | ९६९०० | १०५८०० | ११४२०० | विलिन | १२२९०० | १३०४०० | विलिन | १३४४०० |
| ३६ | विलिन | ८४५०० | ९०२०० | विलिन | ९९८०० | १०९००० | ११७६०० | विलिन | १२६६०० | १३४३०० | विलिन | १३८४०० |
| ३७ | विलिन | ८७००० | ९२९०० | विलिन | १०२८०० | ११२३०० | १२११०० | विलिन | १३०४०० | १३८३०० | विलिन | १४२६०० |
| ३८ | विलिन | ८९६०० | ९५७०० | विलिन | १०५९०० | ११५७०० | १२४७०० | विलिन | १३४३०० | १४२४०० | विलिन | १४६९०० |
| ३९ | विलिन | ९२३०० | ९८६०० | विलिन | १०९१०० | ११९२०० | १२८४०० | विलिन | १३८३०० | १४६७०० | विलिन | १५१३०० |
| ४० | विलिन | ९५१०० | १०१६०० | विलिन | ११२४०० | १२२८०० | १३२३०० | विलिन | १४२४०० | १५११०० | विलिन | १५५८०० |

| तक्ता क्र. ४.१ : राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांसाठी सुधारित वेतन मॅट्रिक्स | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | वेतनबँड - पीबी २ : रु | वेतनबँड - पीबी ३ : रु.१५६००-३९१०० | | | | | | | | |
| | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | ३१ | ३२ | ३३ | ३४ |
| **ग्रेड वेतन** | ५४०० | ५००० | ५४०० | ५५०० | ५७०० | ५८०० | ६६०० | ६९०० | ७६०० | ७९०० |
| **थेट नियुक्तीचे वेतनबँड मधील वेतन** | १४४५० | १५६०० | १५६०० | १५८७० | १६३९० | १६६६० | १८७५० | १९७०० | २१९०० | २२८५० |
| **विलिनीकरण** | पीबी -३ +५४०० मध्ये विलिन | | | | ५८०० | | | | | |
| **थेट नियुक्तीचे एकूण वेतन** | १९८५० | २०६०० | २१००० | २१३७० | २२०९० | २२४६० | २५३५० | २६६०० | २९५०० | ३०७५० |
| **स्तर** | **विलिन** | **एस-१९** | **एस-२०** | **एस-२१** | **विलिन** | **एस-२२** | **एस-२३** | **एस-२४** | **एस-२५** | **एस-२६** |
| १ | विलिन | ५५१०० | ५६१०० | ५७१०० | **विलिन** | ६०००० | ६७७०० | ७११०० | ७८८०० | ८२२०० |
| २ | विलिन | ५६८०० | ५७८०० | ५८८०० | **विलिन** | ६१८०० | ६९७०० | ७३२०० | ८१२०० | ८४७०० |
| ३ | विलिन | ५८५०० | ५९५०० | ६०६०० | **विलिन** | ६३७०० | ७१८०० | ७५४०० | ८३६०० | ८७२०० |
| ४ | विलिन | ६०३०० | ६१३०० | ६२४०० | **विलिन** | ६५६०० | ७४००० | ७७७०० | ८६१०० | ८९८०० |
| ५ | विलिन | ६२१०० | ६३१०० | ६४३०० | **विलिन** | ६७६०० | ७६२०० | ८०००० | ८८७०० | ९२५०० |
| ६ | विलिन | ६४००० | ६५००० | ६६२०० | **विलिन** | ६९६०० | ७८५०० | ८२४०० | ९१४०० | ९५३०० |
| ७ | विलिन | ६५९०० | ६७००० | ६८२०० | **विलिन** | ७१७०० | ८०९०० | ८४९०० | ९४१०० | ९८२०० |
| ८ | विलिन | ६७९०० | ६९००० | ७०२०० | **विलिन** | ७३९०० | ८३३०० | ८७४०० | ९६९०० | १०११०० |
| ९ | विलिन | ६९९०० | ७११०० | ७२३०० | **विलिन** | ७६१०० | ८५८०० | ९०००० | ९९८०० | १०४१०० |
| १० | विलिन | ७२००० | ७३२०० | ७४५०० | **विलिन** | ७८४०० | ८८४०० | ९२७०० | १०२८०० | १०७२०० |
| ११ | विलिन | ७४२०० | ७५४०० | ७६७०० | **विलिन** | ८०८०० | ९११०० | ९५५०० | १०५९०० | ११०४०० |
| १२ | विलिन | ७६४०० | ७७७०० | ७९००० | **विलिन** | ८३२०० | ९३८०० | ९८४०० | १०९१०० | ११३७०० |
| १३ | विलिन | ७८७०० | ८०००० | ८१४०० | **विलिन** | ८५७०० | ९६६०० | १०१४०० | ११२४०० | ११७१०० |
| १४ | विलिन | ८११०० | ८२४०० | ८३८०० | **विलिन** | ८८३०० | ९९५०० | १०४४०० | ११५८०० | १२०६०० |
| १५ | विलिन | ८३५०० | ८४९०० | ८६३०० | **विलिन** | ९०९०० | १०२५०० | १०७५०० | ११९३०० | १२४२०० |
| १६ | विलिन | ८६००० | ८७४०० | ८८९०० | **विलिन** | ९३६०० | १०५६०० | ११०७०० | १२२९०० | १२७९०० |
| १७ | विलिन | ८८६०० | ९०००० | ९१६०० | **विलिन** | ९६४०० | १०८८०० | ११४००० | १२६६०० | १३१७०० |
| १८ | विलिन | ९१३०० | ९२७०० | ९४३०० | **विलिन** | ९९३०० | ११२१०० | ११७४०० | १३०४०० | १३५७०० |
| १९ | विलिन | ९४००० | ९५५०० | ९७१०० | **विलिन** | १०२३०० | ११५५०० | १२०९०० | १३४३०० | १३९८०० |
| २० | विलिन | ९६८०० | ९८४०० | १००००० | **विलिन** | १०५४०० | ११९००० | १२४५०० | १३८३०० | १४४००० |
| २१ | विलिन | ९९७०० | १०१४०० | १०३००० | **विलिन** | १०८६०० | १२२६०० | १२८२०० | १४२४०० | १४८३०० |
| २२ | विलिन | १०२७०० | १०४४०० | १०६१०० | **विलिन** | १११९०० | १२६३०० | १३२००० | १४६७०० | १५२७०० |
| २३ | विलिन | १०५८०० | १०७५०० | १०९३०० | **विलिन** | ११५३०० | १३०१०० | १३६००० | १५११०० | १५७३०० |
| २४ | विलिन | १०९००० | ११०७०० | ११२६०० | **विलिन** | ११८८०० | १३४००० | १४०१०० | १५५६०० | १६२००० |
| २५ | विलिन | ११२३०० | ११४००० | ११६००० | **विलिन** | १२२४०० | १३८००० | १४४३०० | १६०३०० | १६६९०० |
| २६ | विलिन | ११५७०० | ११७४०० | ११९५०० | **विलिन** | १२६१०० | १४२१०० | १४८६०० | १६५१०० | १७१९०० |
| २७ | विलिन | ११९२०० | १२०९०० | १२३१०० | **विलिन** | १२९९०० | १४६४०० | १५३१०० | १७०१०० | १७७१०० |
| २८ | विलिन | १२२८०० | १२४५०० | १२६८०० | **विलिन** | १३३८०० | १५०८०० | १५७७०० | १७५२०० | १८२४०० |
| २९ | विलिन | १२६५०० | १२८२०० | १३०६०० | **विलिन** | १३७८०० | १५५३०० | १६२४०० | १८०५०० | १८७९०० |
| ३० | विलिन | १३०३०० | १३२००० | १३४५०० | **विलिन** | १४१९०० | १६०००० | १६७३०० | १८५९०० | १९३५०० |
| ३१ | विलिन | १३४२०० | १३६००० | १३८५०० | **विलिन** | १४६२०० | १६४८०० | १७२३०० | १९१५०० | १९९३०० |
| ३२ | विलिन | १३८२०० | १४०१०० | १४२७०० | **विलिन** | १५०६०० | १६९७०० | १७७५०० | १९७२०० | २०५३०० |
| ३३ | विलिन | १४२३०० | १४४३०० | १४७००० | **विलिन** | १५५१०० | १७४८०० | १८२८०० | २०३१०० | २११५०० |
| ३४ | विलिन | १४६६०० | १४८६०० | १५१४०० | **विलिन** | १५९८०० | १८०००० | १८८३०० | २०९२०० | |
| ३५ | विलिन | १५१००० | १५३१०० | १५५९०० | **विलिन** | १६४६०० | १८५४०० | १९३९०० | | |
| ३६ | विलिन | १५५५०० | १५७७०० | १६०६०० | **विलिन** | १६९५०० | १९१००० | १९९७०० | | |
| ३७ | विलिन | १६०२०० | १६२४०० | १६५४०० | **विलिन** | १७४६०० | १९६७०० | २०५७०० | | |
| ३८ | विलिन | १६५००० | १६७३०० | १७०४०० | **विलिन** | १७९८०० | २०२६०० | २११९०० | | |

| तक्ता क्र. ४.१ : राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांसाठी सुधारित वेतन मॅट्रिक्स | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | वेतनबँड - पीबी २ : रु | वेतनबँड - पीबी ३ : रु.१५६००-३९१०० | | | | | | | | |
| | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | ३१ | ३२ | ३३ | ३४ |
| **ग्रेड वेतन** | ५४०० | ५००० | ५४०० | ५५०० | ५७०० | ५८०० | ६६०० | ६९०० | ७६०० | ७९०० |
| **थेट नियुक्तीचे वेतनबँड मधील वेतन** | १४४५० | १५६०० | १५६०० | १५८७० | १६३९० | १६६६० | १८७५० | १९७०० | २१९०० | २२८५० |
| **विलिनीकरण** | पीबी -३ +५४०० मध्ये विलिन | | | | ५८०० | | | | | |
| **थेट नियुक्तीचे एकूण वेतन** | १९८५० | २०६०० | २१००० | २१३७० | २२०९० | २२४६० | २५३५० | २६६०० | २९५०० | ३०७५० |
| **स्तर** | विलिन | **एस-१९** | **एस-२०** | **एस-२१** | **विलिन** | **एस-२२** | **एस-२३** | **एस-२४** | **एस-२५** | **एस-२६** |
| ३९ | विलिन | १७०००० | १७२३०० | १७५५०० | **विलिन** | १८५२०० | २०८७०० | | | |
| ४० | विलिन | १७५१०० | १७७५०० | १८०८०० | **विलिन** | १९०८०० | | | | |

| तक्ता क्र. ४.१ : राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांसाठी सुधारित वेतन मॅट्रिक्स | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | वेतनबँड - पीबी ४ : रु.३७४००-६७००० | | | | ६७०००-७९००० |
| | ३५ | ३६ | ३७ | ३८ | ३९ |
| **ग्रेड वेतन** | ८७०० | ८८०० | ८९०० | १०००० | ६७०००-७९००० |
| **थेट नियुक्तीचे वेतनबँड मधील वेतन** | ३७४०० | ३८८०० | ४०२०० | ४३००० | |
| **विलिनीकरण** | | | | | |
| **थेट नियुक्तीचे एकूण वेतन** | ४६१०० | ४७६०० | ४९१०० | ५३००० | |
| **स्तर** | **एस -२७** | **एस -२८** | **एस -२९** | **एस -३०** | **एस -३१** |
| १ | ११८५०० | १२४८०० | १३११०० | १४४२०० | १८२२०० |
| २ | १२२१०० | १२८५०० | १३५००० | १४८५०० | १८७७०० |
| ३ | १२५८०० | १३२४०० | १३९१०० | १५३००० | १९३३०० |
| ४ | १२९६०० | १३६४०० | १४३३०० | १५७६०० | १९९१०० |
| ५ | १३३५०० | १४०५०० | १४७६०० | १६२३०० | २०५१०० |
| ६ | १३७५०० | १४४७०० | १५२००० | १६७२०० | २११३०० |
| ७ | १४१६०० | १४९००० | १५६६०० | १७२२०० | २१७६०० |
| ८ | १४५८०० | १५३५०० | १६१३०० | १७७४०० | २२०००० |
| ९ | १५०२०० | १५८१०० | १६६१०० | १८२७०० | |
| १० | १५४७०० | १६२८०० | १७११०० | १८८२०० | |
| ११ | १५९३०० | १६७७०० | १७६२०० | १९३८०० | |
| १२ | १६४१०० | १७२७०० | १८१५०० | १९९६०० | |
| १३ | १६९००० | १७७९०० | १८६९०० | २०५६०० | |
| १४ | १७४१०० | १८३२०० | १९२५०० | २११८०० | |
| १५ | १७९३०० | १८८७०० | १९८३०० | २१८२०० | |
| १६ | १८४७०० | १९४४०० | २०४२०० | | |
| १७ | १९०२०० | २००२०० | २१०३०० | | |
| १८ | १९५९०० | २०६२०० | २१६६०० | | |
| १९ | २०१८०० | २१२४०० | | | |
| २० | २०७९०० | | | | |
| २१ | २१४१०० | | | | |

**४.६ महिला व बालविकास विभाग, जलसंपदा विभाग आणि उच्च व तंत्र शिक्षण विभाग (अकृषि विद्यापीठे) या मधील काही संवर्गांच्या सुधारित वेतन मॅट्रिक्समधील वेतन स्तरांविषयी शिफारशी-**

**४.६.१ महिला व बालविकास विभाग - समुपदेशक**

शासन निर्णय दि. २५ मार्च, २००९ अन्वये महिला व बालविकास विभागांतर्गत ५ व्या वेतन आयोगाच्या रु. ५०००-८००० या वेतनश्रेणीत, समुपदेशक संवर्गात ४७ पदे निर्माण करण्यात आली आहेत. या वेतनश्रेणीस ६ व्या वेतन आयोगानुसार वेतनबँड पीबी-२ : रु. ९३००-३४८०० + रु. ४२०० ग्रेड वेतन ही समकक्ष वेतन संरचना अनुज्ञेय आहे. तद्नंतर शासन निर्णय दि. ३० नोव्हेंबर, २०११ अन्वये याच संवर्गात परंतु वेतनबँड पीबी-२: रु. ९३००-३४८०० + रु. ४३०० ग्रेड वेतन या वेतन संरचनेत ४ पदे निर्माण करण्यात आली आहेत. वास्तविक आस्थापनेवरील मंजूर संवर्गात अधिक पदे निर्माण करताना ती त्या संवर्गास आधी मंजूर केलेल्या वेतनश्रेणीमध्येच करणे आवश्यक आहे. त्यानुसार दि. ३० नोव्हेंबर, २०११ अन्वये नवीन पदे निर्माण करताना ती वेतनबँड पीबी-२: रु. ९३००-३४८०० + रु. ४२०० ग्रेड वेतन या वेतन संरचनेतच करावयास हवी होती. शासन निर्णय दि. २५ मार्च, २००९ आणि दि. ३० नोव्हेंबर, २०११ अन्वये निर्माण केलेल्या पदांच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या एकच आहेत. त्यामुळे नवीन पदे तुलनेने उच्च वेतनश्रेणीत निर्माण करण्यास कोणतेही समर्थनीय कारण दिसून येत नाही.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता वेतनबँड पीबी-२ : रु. ९३००-३४८०० + रु. ४२०० ग्रेड वेतन आणि वेतनबँड पीबी-२: रु. ९३००-३४८०० + रु. ४३०० ग्रेड वेतन या दोन्ही वेतन संरचनेतील समुपदेशक या संवर्गास सुधारित वेतन मॅट्रिक्समध्ये एकच वेतन स्तर एस-१३ मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

### ४.६.२ जलसंपदा विभाग

४.६.२.१ राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ च्या (हकीम समिती) अहवालातील परिच्छेद ३.७.२ मध्ये पदोन्नतीच्या व निम्न संवर्गास एकच वेतनसंरचना अनुज्ञेय झाल्यास पदोन्नतीच्या संवर्गास समुचित अतिरिक्त ग्रेड वेतन मंजूर करण्याची शिफारस करण्यात आली होती. सदर शिफारस शासन निर्णय वित्त विभाग दि. २७ फेब्रुवारी, २००९ अन्वये स्वीकारली आहे. त्यानुसार ज्या प्रकरणी पदोन्नतीच्या व निम्न संवर्गास एकच वेतन संरचना अनुज्ञेय झाली आहे, अशा प्रकरणी पदोन्नतीच्या संवर्गास अतिरिक्त ग्रेड वेतन मंजूर करण्याचा प्रस्ताव संबंधित प्रशासकीय विभागाने सादर केल्यानंतर वित्त विभागाकडून अतिरिक्त ग्रेड वेतन मंजूरीचे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

४.६.२.२ जलसंपदा विभागाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (मेरी), नाशिक आणि पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे या आस्थापनेवरील पदांना अतिरिक्त ग्रेड वेतन मंजूरीचे आदेश वित्त विभागाकडून निर्गमित करण्यात आले आहेत.

अ) महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (मेरी), नाशिक येथील काही संवर्गांना शासन अधिसूचना वित्त विभाग क्र: वेपूर-१०१४/प्र.क्र.२५/सुधारणा-६६/सेवा-९, दि. २५ जुलै, २०१४ अन्वये खालील तक्त्यातील स्तंभ ६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे अतिरिक्त ग्रेड वेतन मंजूर केले आहे:-

| संवर्गाचे नाव | ५ व्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी (रु.) | ६ व्या वेतन आयोगातील मूळ वेतन संरचना | | ६ व्या वेतन आयोगातील पुन:सुधारित वेतन संरचना | |
|---|---|---|---|---|---|
| | | वेतनबँड (रु.) | ग्रेड वेतन (रु.) | वेतनबँड (रु.) | ग्रेड वेतन (रु.) |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| वैज्ञानिक अधिकारी | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४०० | ९३००-३४८०० | ४८०० |

| संवर्गाचे नाव | ५ व्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी (रु.) | ६ व्या वेतन आयोगातील मूळ वेतन संरचना | | ६ व्या वेतन आयोगातील पुन:सुधारित वेतन संरचना | |
|---|---|---|---|---|---|
| | | वेतनबँड (रु.) | ग्रेड वेतन (रु.) | वेतनबँड (रु.) | ग्रेड वेतन (रु.) |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| वरिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४३०० | ९३००-३४८०० | ४६०० |
| कनिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक | ५०००-८००० | ९३००-३४८०० | ४२०० | ९३००-३४८०० | ४४०० |

ब) पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे या आस्थापनेवरील काही संवर्गांना शासन अधिसूचना वित्त विभाग क्र: वेपूर-२०१६/प्र.क्र.४२/सुधारणा - ७७/सेवा-९, दि. ३० जून, २०१६ अन्वये खालील तक्त्यातील स्तंभ ६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे अतिरिक्त ग्रेड वेतन मंजूर केले आहे:-

| संवर्गाचे नाव | ५ व्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी (रु.) | ६ व्या वेतन आयोगातील मूळ वेतन संरचना | | ६ व्या वेतन आयोगातील पुन:सुधारित वेतन संरचना | |
|---|---|---|---|---|---|
| | | वेतनबँड (रु.) | ग्रेड वेतन (रु.) | वेतनबँड (रु.) | ग्रेड वेतन (रु.) |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| उप मृद सर्वेक्षण अधिकारी | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४०० | ९३००-३४८०० | ४८०० |
| वरिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४३०० | ९३००-३४८०० | ४६०० |
| कनिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक | ५०००-८००० | ९३००-३४८०० | ४२०० | ९३००-३४८०० | ४४०० |

४.६.२.३ राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ ची शिफारस आणि शासन निर्णय वित्त विभाग दि. २७ फेब्रुवारी, २००९ सोबतच्या प्रपत्रातील अनुक्रमांक ९ येथील तक्त्यातील (ब) नुसार विद्यमान वेतनश्रेणीतील रु. ५००० व त्यापेक्षा जास्त व रु. ८००० पेक्षा कमी किमान वेतन असलेल्या संवर्गांना एकच सुधारित वेतन संरचना अनुज्ञेय होत असेल तर पदोन्नतीच्या संवर्गास रु. २०० अतिरिक्त ग्रेड वेतन अनुज्ञेय आहे.

वरील दोन्ही आस्थापनांमधील संशोधन सहाय्यक आणि कनिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक या दोन्ही संवर्गाचे ग्रेड वेतन रू. ४२०० असल्याने व कनिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक हा पदोन्नतीचा संवर्ग असल्याने या संवर्गास रु. ४४०० ग्रेड वेतन अनुज्ञेय ठरते.

तसेच कनिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक या संवर्गाचे ग्रेड वेतन पदोन्नतीच्या वरिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक या संवर्गाच्या रु. ४३०० ग्रेड वेतनापेक्षा जास्त होत असल्याने त्या संवर्गासही रु. २०० अतिरिक्त ग्रेड वेतन अनुज्ञेय करुन रु. ४५०० ग्रेड वेतन मंजूर करणे आवश्यक होते.

वरील परिणामी वरिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक या संवर्गाचे ग्रेड वेतन पदोन्नतीच्या वैज्ञानिक अधिकारी / उप मृद सर्वेक्षण अधिकारी या संवर्गाच्या रु. ४४०० ग्रेड वेतनापेक्षा जास्त होत असल्याने वैज्ञानिक अधिकारी / उप मृद सर्वेक्षण अधिकारी या संवर्गानाही रु. २०० अतिरिक्त ग्रेड वेतन अनुज्ञेय करुन त्या संवर्गास रु. ४६०० ग्रेड वेतन मंजूर करणे आवश्यक होते. परंतु जलसंपदा विभागाने वरील दोन्ही आस्थापनेवरील तीनही संवर्गांना अनुक्रमे रु. ४४००, रु. ४६०० आणि रु. ४८०० ग्रेड वेतन मंजूर करण्याचे प्रस्तावित केले होते. त्यानुसार वित्त विभागाने वर नमूद आदेशांद्वारे सुधारणा केली आहे. राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ ची शासनाने स्वीकारलेली शिफारस विचारात घेता सदर अतिरिक्त ग्रेड वेतन मंजूर करण्याची कार्यवाही विसंगत आहे.

४.६.२.४ वरील पार्श्वभूमीवर दि. २५ जुलै, २०१४ आणि दि. ३० जून, २०१६ रोजीच्या अधिसूचना रद्द करुन वरील दोन्ही आस्थापनांवरील प्रत्येकी तीनही संवर्गांना पुढीलप्रमाणे वेतन संरचना मंजूर करण्याची समिती शिफारस करीत आहे:-

**महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (मेरी), नाशिक आणि पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे**

| अ.क्र. | संवर्गाचे नाव | ६ व्या वेतन आयोगातील सुधारित वेतन संरचना | |
|---|---|---|---|
| | | वेतनबँड (रु.) | ग्रेड वेतन (रु.) |
| १ | वैज्ञानिक अधिकारी / उप मृद सर्वेक्षण अधिकारी | ९३००-३४८०० | ४६०० |
| २ | वरिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक | ९३००-३४८०० | ४५०० |
| ३ | कनिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक | ९३००-३४८०० | ४४०० |

वरील परिच्छेदमध्ये शिफारस केल्याप्रमाणे ६ व्या वेतन आयोगातील सुधारित वेतन संरचना मंजूर करुन पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी:-

संबंधित संवर्गातील कर्मचाऱ्यांची दि. १ जानेवारी, २००६ पासून आता शिफारस केलेल्या वेतन संरचनेत वेतननिश्चिती करण्यात यावी. मात्र अतिप्रदानाची रक्कम वसूल करण्यात येऊ नये. तसेच आता शिफारस केलेल्या ६ व्या वेतन आयोगाच्या वेतन संरचना आधारभूत मानून ७ व्या वेतन आयोगात तक्ता क्रमांक ४.१ मध्ये नमूद केलेल्या सुधारित वेतन मॅट्रिक्समधील समकक्ष वेतन स्तर मंजूर करण्यात यावा.

**४.६.३ उच्च व तंत्र शिक्षण विभाग (अकृषि विद्यापीठे)**

उच्च व तंत्र शिक्षण विभागाशी संबंधित मागण्यांच्या अनुषंगाने समितीने दि. ५ ऑक्टोबर, २०१८ रोजी सर्व संबंधितांशी चर्चा केली. सदर बैठकीमध्ये काही विद्यापीठांतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी तसेच कर्मचारी संघटनांनी त्यांच्या संवर्गांच्या वेतनश्रेण्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ, नांदेड या विद्यापीठांतील शिक्षकेतर संवर्गांप्रमाणे सुधारित करण्यात याव्यात, अशी आग्रही मागणी समितीकडे केली. या संदर्भात, वेगवेगळ्या विद्यापीठांमधील शिक्षकेतर संवर्गांच्या वेतनश्रेण्यांमध्ये तफावत का आहे, याबाबत समितीने बैठकीस उपस्थित उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली. चर्चेअंती पुढील बाबी समितीच्या निदर्शनास आल्या आहेत :-

(अ) उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखाली खाली नमूद केलेल्या एकूण १३ विद्यापीठांचा समावेश आहे :-

१. मुंबई विद्यापीठ,मुंबई
२. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
३. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
४. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
५. संत गाडगेबाबा विद्यापीठ, अमरावती
६. सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
७. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
८. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
९. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे,
१०. श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई
११. कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, नागपूर
१२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे
१३. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक

(ब) उच्च व तंत्र शिक्षण विभागाने, शासन अधिसूचना उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण २००९/३२६०९/विशि-१ दिनांक ७ ऑक्टोबर, २००९ अन्वये, वित्त विभागाच्या मान्यतेने अकृषि विद्यापीठांमधील शिक्षकेतर संवर्गांच्या वेतनश्रेण्या ६ व्या वेतन आयोगानुसार सुधारित केल्या आहेत.

(क) वित्त विभागाने दि. १०/९/२००१ च्या शासन निर्णयान्वये सर्व पदांचा आढावा घेऊन आकृतिबंध निश्चित करण्याचे आदेश सर्व विभागांना दिले होते. त्यानुषंगाने संयुक्त सचिव समितीच्या बैठकीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे आणि यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई व कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, नागपूर ही विद्यापीठे वगळता अन्य विद्यापीठांचा विचार करण्यात आला होता. श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई व कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, नागपूर यांचा वेगळा आकृतिबंध तयार करण्यात

आला. उच्च व तंत्रशिक्षण विभागाने ९ विद्यापीठातील पदांच्या आकृतिबंधास वित्त विभागाची मान्यता घेऊन शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण २००७/(१२२/०७)विशि (प्रशा) दि. ६/७/२००९ निर्गमित केला. या शासन निर्णयामध्ये संवर्गनिहाय एकूण पदसंख्या नमूद करण्यात आलेली आहे. या संबंधित अभिलेखांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, संबंधित संयुक्त सचिव समितीच्या बैठकीमध्ये संवर्गनिहाय एकूण पदसंख्येस मान्यता देण्यात आलेली आहे. तथापि, त्यानंतर उच्च व तंत्र शिक्षण विभागाने वेगवेगळ्या विद्यापीठांतील पदांच्या वेतनश्रेणी व पदनाम बदलाबाबत खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित केले आहेत :-

| तपशिल | शासन निर्णय/आदेश क्रमांक | दिनांक |
|---|---|---|
| आकृतिबंध निश्चिती (९ विद्यापिठे) | संकीर्ण२००७/(१२२/०७)विशि-१ | दि.६/७/२००९ |
| शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | एसयुके २०१०/(४७०/१०) विशि- १, दि. १३/१०/२०१० अधिक्रमित करुन एसयुके २०११/(७१/११) विशि- १ | दि. १३/१०/२०१० दि. २४/२/२०११ |
| गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली | जीयुजी २०११/(५६४/११)/ विशि- १ | दि. १५/२/२०१२ |
| डॉ. बाबासाहेब आंबेडकर, विद्यापीठ, औरंगाबाद | बीएमयु२००९/(३४८/०९)/विशि- १ | दि.१७/७/२००९ |
| | अधिक्रमित करुन | |
| | बीएमयु २०११/ (१३८/११) विशि- १ | दि. ७/४/२०११ |
| संत गाडगेबाबा विद्यापीठ, अमरावती | एसएयु २००९(३७२/०९)/ विशि- १ | दि.५/९/२००९ |
| | अधिक्रमित करुन | |
| | एसएयु २०११/(४९३/११)/विशि १ | दि.२२/११/२०११ |
| उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव | एनएमयु २००९/(५०४/०९)/विशि १ | दि.४/१२/२००९ |
| | अधिक्रमित करुन | |
| | एनएमयु २०१०/(५६७/१०)/विशि १ | दि.२६/१०/१० |
| विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोगानुसार सुधारित वेतनसंरचना मंजूर करण्याबाबत | सवेआ २००९/(३२६/०९)/ विशि- १ | दि.७/१०/२००९ |

(क) विभागाच्या मागण्यांच्या चर्चेदरम्यान वरीलप्रमाणे अनियमितता झाल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. तसेच वित्त विभागाच्या मान्यतेशिवाय पदनामात आणि वेतनश्रेणीत बदल केले गेले असल्याचे उच्च तंत्र शिक्षण विभागाने मान्य केले आहे.

वरील प्रकरण नमूना म्हणून विचार केल्यास याच पध्दतीने विभागाच्या अखत्यारीतील अन्य विद्यापीठांतही या अनियमितता झालेल्या असू शकतील, असा निष्कर्ष काढणे अयोग्य ठरणार नाही. त्यामुळे उपरोक्त सर्व विद्यापीठांत शिक्षकेतर पदांच्या ६ व्या वेतन आयोगानुसार मंजूर केलेल्या वेतनश्रेण्यांची तपासणी करून संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांकडून झालेले अतिप्रदान वसूल करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

तसेच योग्य त्या कार्यपध्दतीचा अवलंब न करता निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील ज्या पदनामांमध्ये व वेतनश्रेण्यांमध्ये नियमबाह्य बदल केल्यामुळे शासनाचे नुकसान झालेले आहे, अशी सर्व पदनामे व त्या पदांना मंजूर केलेल्या वेतनश्रेण्या ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारित करण्यापूर्वीच दिनांक ७.१०.२००९ च्या शासन अधिसूचनेनुसार कटाक्षाने पूर्ववत करण्याची कार्यवाही उच्च व तंत्र शिक्षण विभागाने तातडीने करावी, तसेच अशा अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांच्यावर त्वरीत शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस समिती करीत आहे.

### ४.७ मंत्रालयीन लिपिक-टंकलेखक संवर्गासाठी सुधारित वेतन स्तर

मंत्रालयीन प्रशासकीय विभागांतील (मंत्रालय खुद्द) लिपिक-टंकलेखक संवर्गातील कर्मचाऱ्यांची नियुक्ती महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत केली जाते. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची निवड प्रक्रिया ही स्पर्धात्मक व दर्जात्मक असते. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडील निवडीनंतरसुध्दा असे दिसून येते की, मोठ्या प्रमाणात लिपिक-टंकलेखक संवर्गात निवड झालेले कर्मचारी मंत्रालयीन सेवेत रूजू होत नाहीत. इतकेच नाही तर जे रूजू होतात, ते अल्पावधीत सेवा सोडून जातात. सामान्य प्रशासन विभाग आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून पद भरतीकरिता केलेल्या संपूर्ण मेहनत वाया जाते. परिणामी पदे रिक्त राहतात आणि राज्याच्या प्रशासकीय मुख्यालयाच्या दैनंदिन कामकाजामध्ये वारंवार अडचणी उद्भवतात. शासकीय नोकरी सुरक्षित आणि समाजात प्रतिष्ठीत समजली जाते. स्पर्धा

परिक्षेतून शासकीय सेवेत नियुक्ती होणे ही अवघड बाब आहे, असे असतानाही मंत्रालयामध्ये लिपिक-टंकलेखक संवर्गातील पदे एवढ्या मोठ्या प्रमाणात रिक्त का राहतात तसेच या पदावर रूजू झालेले कर्मचारी अल्पावधीत नोकरी सोडतात याचा समितीने परामर्ष घेतला असता त्याची कारणे प्रामुख्याने अपुरी आणि महागडी निवास व्यवस्था, जिकीरीचा प्रवास आणि संवर्ग मंत्रालयाबाहेर बदलीपात्र नसणे ही असल्याचे आढळून आले आहे. या संवर्गातील कर्मचाऱ्यांना बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात तसेच जवळच्या उपनगरात अगदी भाडे तत्त्वावरदेखील घर घेणे शक्य होत नाही. त्यामुळे दूर उपनगरात राहणे भाग पडते. परिणामी प्रवासाच्या वेळेत आणि खर्चात वाढ होते. त्यामुळे कनिष्ठ वेतनश्रेणीतील शासकीय नोकरी मुंबईमध्ये पूर्वीपासून वास्तव्यास असणाऱ्यांना परवडू शकते. मुंबईबाहेरून दूरवरच्या भागांतून येणाऱ्यांसाठी ते परवडणारे नाही. मंत्रालयातील लिपिक-टंकलेखक संवर्गात महाराष्ट्रातील जिल्हा स्तरावरील ग्रामीण भागातून उमेदवार येण्यास अनुत्सुक असतात. वरील सर्व बाबींचा तसेच मंत्रालयीन कामकाजाचे विशिष्ट स्वरूप याचा साकल्याने विचार करुन विद्यमान वेतनबँड पीबी - १ + ग्रेड वेतन रु. १९०० या वेतन संरचनेतील मंत्रालयीन लिपिक-टंकलेखक संवर्गास सुधारित वेतन मॅट्रिक्समधील स्तर एस-८: रु. २५५००-८११०० मंजूर करण्याची समिती शिफारस करीत आहे. याबाबतची अट / शर्त पुढीलप्रमाणे राहील:-

जे कर्मचारी मंत्रालयातील लिपिक-टंकलेखक संवर्गात नियुक्त होऊन मंत्रालयाबाहेरील कार्यालयात बदलीने/प्रतिनियुक्तीने नियुक्त झाल्यास अथवा कायम स्वरुपी समावेशन झाल्यास त्यांना लिपिक-टंकलेखक संवर्गाच्या एस-६: रु. १९९००-६३२०० या वेतन स्तरानुसार वेतन अनुज्ञेय राहील. एस-८: रु. २५५००-८११०० या वेतन स्तरामध्ये त्यांनी घेतलेले वेतन संरक्षित होणार नाही.

### ४.८ सुधारित वेतन मॅट्रिक्समध्ये वेतननिश्चिती

राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांची दि.१ जानेवारी, २०१६ पासून सुधारित वेतन मॅट्रिक्समध्ये पुढीलप्रमाणे वेतननिश्चिती करण्यात यावी:-

विद्यमान वेतन संरचनेत दि. १ जानेवारी, २०१६ रोजीच्या मूळ वेतनास (वेतन + ग्रेड वेतन) २.५७ ने गुणून नजीकच्या रुपयामध्ये पूर्णांकित (Rounding off) केलेली रक्कम संबंधित संवर्गास/पदास सुधारित वेतन मॅट्रिक्समध्ये अनुज्ञेय वेतन स्तरामधील सेलमध्ये (Cell) असल्यास ती रक्कम सुधारित वेतन ठरेल. जर ती रक्कम वेतन स्तरामधील सेलमध्ये नसेल तर सदर पूर्णांकित रकमेच्या लगतच्या पुढील सेलमधील रक्कम सुधारित वेतन ठरेल.

वेतननिश्चितीच्या वरील सुत्रानुसार होणारी वेतननिश्चिती उदाहरणादाखल पुढील तक्त्यात नमूद केली आहे :-

| सुधारित वेतन मॅट्रिक्समध्ये दि. १ जानेवारी, २०१६ रोजी होणारी वेतननिश्चिती | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | विद्यमान वेतन संरचना (वेतनबँड + ग्रेड वेतन) | विद्यमान वेतन संरचनेतील दि. १.१.२०१६ रोजीचे मूळ वेतन (रु.) | स्तंभ ३ मधील मूळ वेतनास २.५७ ने गुणून येणारी रक्कम (रु.) | स्तंभ ४ मधील रक्कम नजीकच्या रुपयामध्ये पूर्णांकित केल्यावर येणारी रक्कम (रु.) | अनुज्ञेय वेतन स्तर क्र. | निश्चित होणारे वेतन (रु.) |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | रु.४४४०-७४४० + रु.१३०० | ६९३० | १७८१०.१० | १७८१० | एस-१ | १८२०० |
| २ | रु.५२००-२०२०० + रु.१९०० | ८४९० | २१८१९.३० | २१८१९ | एस-६ | २२४०० |
| ३ | रु. ९३००-३४८०० + रु.४४०० | १६१८० | ४१५८२.६० | ४१५८३ | एस-१५ | ४१८०० |

| सुधारित वेतन मॅट्रिक्समध्ये दि. १ जानेवारी, २०१६ रोजी होणारी वेतननिश्चिती | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | विद्यमान वेतन संरचना (वेतनबँड + ग्रेड वेतन) | विद्यमान वेतन संरचनेतील दि. १.१.२०१६ रोजीचे मूळ वेतन (रु.) | स्तंभ ३ मधील मूळ वेतनास २.५७ ने गुणून येणारी रक्कम (रु.) | स्तंभ ४ मधील रक्कम नजीकच्या रुपयामध्ये पूर्णांकित केल्यावर येणारी रक्कम (रु.) | अनुज्ञेय वेतन स्तर क्र. | निश्चित होणारे वेतन (रु.) |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| ४ | रु.१५६००-३९१०० + रु.५४०० | २५१६२ | ६४६६६.३४ | ६४६६६ | एस-२० | ६५००० |
| ५ | रु.३७४००-६७००० + रु.८७०० | ४६००० | ११८२२०.०० | ११८२२० | एस-२७ | ११८५०० |

## ४.९ सुधारित वेतन मॅट्रिक्समधील वेतनवाढीचा दिनांक

विद्यमान वेतन संरचनेतील १ जुलै या वेतनवाढीच्या दिनांकाऐवजी सुधारित वेतन मॅट्रिक्समध्ये १ जानेवारी किंवा १ जुलै असे दोन वेतनवाढीचे दिनांक असतील. कर्मचाऱ्यास त्याची नियुक्ती/पदोन्नती किंवा आर्थिक श्रेणीवाढ या बाबी विचारात घेऊन १ जानेवारी किंवा १ जुलै यापैकी एक वेतनवाढीचा दिनांक अनुज्ञेय होईल.

## ४.१० विशेष वेतन

६ व्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना सुधारित वेतन संरचना लागू केल्यानंतर सर्व संवर्गांचे विशेष वेतन बंद करण्यात आले होते. तथापि पोलीस शिपाई, नाईक आणि हवालदार या संवर्गाशी निगडीत कर्तव्यांचे स्वरुप विचारात घेऊन त्या संवर्गांचे विद्यमान रु.५०० दराने मिळत असलेले विशेष वेतन पुढे चालू ठेवण्यात आले होते. सदर विशेष वेतनात ५० % वाढ करुन ते यापुढे देखील सुरु ठेवण्याची समिती शिफारस करीत आहे.

सदर विशेष वेतन हे ६ व्या वेतन आयोगात मूळ वेतनाचा भाग नव्हते. त्यामुळे ते ठोक रक्कम स्वरुपात अनुज्ञेय होते. त्यावर आनुषंगिक/पूरक भत्ते अनुज्ञेय नव्हते. आता देखील ते ठोक रक्कम स्वरुपातच अनुज्ञेय राहील. त्यावर अनुषंगिक/पूरक भत्ते अनुज्ञेय राहणार नाहीत, ही बाब स्पष्ट नमूद करण्यात येत आहे.

### ४.११ नियत/एकत्रित वेतनावरील अंशकालिन कर्मचाऱ्यांच्या वेतनात सुधारणा

सर्वसाधारणपणे ज्या कामांसाठी अंशकालिन कर्मचारी नियुक्त केले जातात अशी कामे आता बाह्यस्त्रोतामार्फत करण्याचे शासनाचे प्रचलित धोरण असल्याने नव्याने अंशकालिक कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या करणे अपेक्षित नाही. मात्र कार्यरत अंशकालिन कर्मचाऱ्यांच्या नियत/एकत्रित वेतनात सुधारणा करणे आवश्यक आहे.

शासन निर्णय वित्त विभाग क्र.वेपुर-१२०९/प्र. क्र.२०/सेवा-९, दिनांक २७ फेब्रुवारी, २००९ अन्वये नियत/एकत्रित वेतनावरील अंशकालिन कर्मचाऱ्यांचे वेतन दुप्पट करुन ते किमान रु. ६०० आणि कमाल रु. १२०० इतके करण्यात आले आहे. अंशकालिन कर्मचाऱ्यांचे सध्याचे नियत/एकत्रित दरमहा वेतन अडीच पट करण्यात यावे, ही वाढीव रक्कम किमान रु. १५०० आणि कमाल रु. ३५०० या मर्यादेत राहील, अशी समितीची शिफारस आहे.

### ४.१२ महागाई भत्ता

केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांना दि. १.१.२०१६ पासून लागू करण्यात आलेले महागाई भत्त्याचे दर राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना लागू करण्यात यावेत.

### ४.१३ शिफारशींची व्याप्ती

या प्रकरणातील शिफारशी पात्र राज्य शासकीय कर्मचारी, जिल्हा परिषदा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, न्यायालयातील अन्यायिक कर्मचारी, अनुदानित शाळेतील कर्मचारी, कृषि व अकृषि विद्यापीठे आणि त्यांना संलग्न अनुदान प्राप्त अशासकीय

महाविद्यालयातील कर्मचारी तसेच इतर अनुदान प्राप्त संस्थांतील कर्मचाऱ्यांना लागू होतील. या शिफारशी इतर कार्यालयांतील / संस्थांतील कर्मचाऱ्यांना लागू करण्याचा दिनांक राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे असावा, अशी समिती शिफारस करीत आहे.

### ४.१४ अंमलबजावणीचा दिनांक

राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना दि.१ जानेवारी, २०१६ पासून सुधारित वेतन मॅट्रिक्समधील वेतन स्तर अनुज्ञेय करण्यात यावेत आणि शिफारस केलेल्या वेतननिश्चितीच्या सूत्रानुसार वेतननिश्चिती करण्यात यावी.

********

## प्रकरण क्रमांक : ५ सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना

**५.१.** राज्य शासकीय कर्मचारी तसेच जिल्हा परिषदेचे शिक्षकेतर कर्मचारी यांना, चौथ्या वेतन आयोगाच्या कालावधीत केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांना लागू असलेल्या कालबद्ध पदोन्नती योजनेमध्ये (Time Bound Promotion Scheme) आवश्यक तो फेरफार करुन, ही योजना पुढीलप्रमाणे कार्यान्वित करण्यात आली.

**५.१.१.** शासन सेवेत गट-क व गट-ड संवर्गात काही ठिकाणी पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नाहीत तर काही ठिकाणी अशा संधी उपलब्ध असल्या तरी पदोन्ती मिळण्यास प्रदीर्घ कालावधी लागतो. ही बाब विचारात घेऊन, शासन निर्णय साप्रवि दि.०८.०६.१९९५ अन्वये कालबद्ध पदोन्नती योजना (TBPS) राज्य शासकीय कर्मचारी तसेच जिल्हा परिषदेच्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिनांक ०१.१०.१९९४ पासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात आली.

**५.१.२.** ज्या कर्मचाऱ्यांना ही योजना लागू होण्यापूर्वी २ पेक्षा जास्त पदोन्नती मिळाल्या आहेत अशा कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

**५.१.३.** नियमित पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यास तसेच नियमित पदोन्नती नाकारलेल्या कर्मचाऱ्यास या योजनेचा लाभ, मिळू शकणार नाही. या योजनेपूर्वीच ज्यांना (In-Situ) पदोन्नती दिली आहे त्यांना मूळ पदावर पदावनत करण्यात येईल. तशा आशयाचे बंधपत्र संबंधित कर्मचाऱ्याने लिहून द्यावे लागेल. मात्र देण्यात आलेल्या आर्थिक लाभाची वसुली केली जाणार नाही.

**५.१.४.** कालबद्ध पदोन्नती योजनेअंतर्गत संबंधित कर्मचाऱ्याला नियमित पदोन्नती प्रमाणे वेतन निश्चितीचा लाभ देण्यात येईल. मात्र संबंधिताला त्याच वेतन श्रेणीत कार्यात्मक पदोन्नती मिळाल्यावर, वेतन निश्चितीचा लाभ पुन्हा देय होणार नाही.

**५.१.५.** ज्या कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या साखळीतील पदावर, पद अस्तित्वात नाही, अशा कर्मचाऱ्यांना शासन निर्णया समवेतच्या परिशिष्टामध्ये दर्शविण्यात आलेल्या वरीष्ठ वेतन श्रेणीचा लाभ अनुज्ञेय करण्यात आला आहे.

**५.१.६.** कालबद्ध पदोन्नतीचा कार्यकाळ हा दिनांक ०१.१०.१९९४ ते दि.३१.०७.२००१ या कालावधी पर्यंत मर्यादीत होता.

**५.२** राज्य शासकीय कर्मचारी तसेच जिल्हा परिषदेचे शिक्षकेतर कर्मचारी यांना पाचव्या वेतन आयोगाच्या कालावधीत केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांना लागू असलेल्या सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेमध्ये (Assured Career Progression Scheme) आवश्यक तो फेरफार करुन ही योजना पुढीलप्रमाणे कार्यान्वित करण्यात आली.

**५.२.१.** शासन सेवेत गट-क, गट-ड व अराजपत्रीत गट-ब या संवर्गातील राज्य शासकीय कर्मचारी व जिल्हा परिषदेचे शिक्षकेतर कर्मचारी यांना शासन निर्णय साप्रवि दिनांक ०८.०६.१९९५ अन्वये लागू केलेली कालबद्ध पदोन्नती योजना, पाचव्या वेतन आयोगाच्या कालावधीमध्ये बंद करुन त्याऐवजी सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना शासन निर्णय वित्त विभाग दि.२०.०७.२००१ अन्वये दि.०१.०८.२००१ पासून लागू करण्यात आली.

**५.२.२.** ही नवीन योजना रु.८०००-१३५०० व त्याहून कमी वेतनश्रेणीत वेतन घेणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आली. ज्या कर्मचाऱ्यांना सेवेत २ किंवा त्याहून अधिक पदोन्नत्या मिळाल्या आहेत अशा कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

**५.२.३.** नियमित पदोन्नती नाकारलेल्या तसेच नियमित पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ, मिळू शकणार नाही. या योजनेअंतर्गत वरीष्ठ वेतन श्रेणी दिल्यानंतर नियमित पदोन्नती नाकारलेल्या वा नियमित पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांना देण्यात आलेला लाभ काढून घेण्यात येईल. मात्र देण्यात आलेल्या आर्थिक लाभाची वसुली केली जाणार नाही.

**५.२.४.** आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत संबंधित कर्मचाऱ्याला नियमित पदोन्नती प्रमाणे वेतन निश्चितीचा लाभ देण्यात येईल. मात्र संबंधिताला त्याच वेतन श्रेणीत कार्यात्मक पदोन्नती मिळाल्यावर, वेतननिश्चितीचा लाभ पुन्हा देय होणार नाही.

**५.२.५.** ज्या कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या साखळीत, पद अस्तित्वात नाही, अशा कर्मचाऱ्यांना शासन निर्णया समवेतच्या परिशिष्टामध्ये दर्शविण्यात आलेल्या वरीष्ठ वेतन श्रेणीचा लाभ अनुज्ञेय करण्यात आला आहे.

**५.२.६.** आश्वासित प्रगती योजनेचा कार्यकाळ हा दिनांक ०१.०८.२००१ ते दि.३०.०९.२००६ या कालावधी पुरता मर्यादीत होता.

**५.२.७.** ज्या कर्मचाऱ्यांना यापूर्वी कालबद्ध पदोन्नतीचा लाभ मिळाला असेल, त्यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

**५.३.** राज्य शासकीय कर्मचारी तसेच जिल्हा परिषदेचे शिक्षकेतर कर्मचारी यांना सहाव्या वेतन आयोगाच्या कालावधीत केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांना लागू असलेल्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेमध्ये (Modified Assured Career Progression Scheme) आवश्यक तो फेरफार करुन ही योजना पुढीलप्रमाणे कार्यान्वित करण्यात आली.

**५.३.१.** शासन निर्णय वित्त विभाग दिनांक २०.०७.२००१ अन्वये पाचव्या वेतन आयोगाच्या कालावधीत राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना लागू केलेली सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना, सहाव्या वेतन आयोगाच्या कालावधीमध्ये सुधारीत स्वरुपात "सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना" या नावाने शासन निर्णय वित्त विभाग दि.०१.०४.२०१० अन्वये दि.०१.१०.२००६ पासून पुर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात आली.

**५.३.२.** ही नवीन योजना PB-३ (रु.१५६००-३९१००) अधिक ५४०० पर्यंत ग्रेड वेतन घेणाऱ्या कर्मचारी / अधिकारी यांना लागू करण्यात आली. या योजनेअंतर्गत पात्र कर्मचारी / अधिकारी यांना संपूर्ण सेवा कालावधीत कमाल २ वेळा पदोन्नतीच्या पदाची वेतन संरचना अनुज्ञेय करण्यात आली. तथापि ३ किंवा त्यापेक्षा जास्त पदोन्नती मिळालेल्या कर्मचारी / अधिकारी यांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय केलेला नाही. मात्र ज्या कर्मचारी / अधिकाऱ्यास २ प्रत्यक्ष पदोन्नती मिळाल्या आहेत, त्या अधिकारी / कर्मचारी यांस या योजनेखाली फक्त एकच लाभ अनुज्ञेय केला आहे.

**५.३.३.** कालबद्ध पदोन्नती / सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेखाली कर्मचाऱ्याने घेतलेला लाभ हा सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेखालील पहिला लाभ समजण्यात येईल त्याशिवाय विवक्षित सेवा कालावधीनंतर, संबंधित पदाच्या कर्तव्ये व जबाबदारीत वाढ न होता. मंजूर करण्यात येणाऱ्या उच्च वेतन संरचनेचा अथवा अकार्यात्मक वेतन संरचनेचा लाभ हा, या योजनेखालील पहिला लाभ समजण्यात येईल. (उदा : मंत्रालयातील कक्ष अधिकारी यांना ४ वर्षाच्या नियमित सेवेनंतर देण्यात येत असलेली आकार्यात्मक वेतनसंरचना )

**५.३.४.** पहिला लाभ मंजूर केल्यानंतर संबंधित कर्मचारी कार्यात्मक पदोन्नतीस अपात्र ठरला अथवा त्याने कार्यात्मक पदोन्नती नाकारली, तर अशा प्रकरणी संबंधित कर्मचाऱ्याचा थेट दुसऱ्या लाभासाठी विचार करता येणार नाही. मात्र त्याने त्यानंतर कार्यात्मक पदोन्नती स्विकारल्याच्या दिनांकापासून १२ वर्षाच्या नियमित सेवेनंतर त्यास दुसरा लाभ मंजूर करता येईल.

**५.३.५.** या योजनेखाली पहिला / दुसरा अथवा दोन्ही लाभ मंजूर केल्यानंतर कार्यात्मक पदोन्नती नाकारलेल्या अथवा कार्यात्मक पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांना देण्यात आलेला / आलेले, लाभ काढून घेण्यात येतील. तथापि शासन शुद्धीपत्रक, वित्त विभाग दिनांक २३.१२.२०१५ अन्वये काढून घेण्यात आलेल्या लाभाची वसुली करण्यात येणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले.

**५.३.६.** पदोन्नतीच्या साखळीत आकृतीबंधानुसार पद अस्तित्वात नसलेल्या, एकाकी पदावरील पद धारकांना शासन निर्णय वित्त विभाग दिनांक ०५.०७.२०१० अन्वये सुधारीत सेवांतर्गत आश्वासित योजनेचा पहिला व दुसरा लाभ विशिष्ट पद्धतीने अनुज्ञेय करण्यात आलेला आहे. हे लाभ मंजूर केल्याच्या अनुषंगाने संबंधित कर्मचाऱ्याच्या पे बँड मध्ये बदल होणार नाही. मात्र ग्रेड पे मध्ये तसेच मूळ वेतनामध्ये बदल होणे अपेक्षित आहे.

५.३.७ सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा कार्यकाळ हा दिनांक ०१.१०.२००६ पासून पुढे सुरु आहे.

**५.४.** विविध संवर्गाच्या संघटनांनी केलेल्या मागण्यांचा साकल्याने विचार करुन राज्य शासकीय कर्मचारी तसेच जिल्हा परिषदेचे शिक्षकेतर कर्मचारी, १००% अनुदानित संस्था, स्वायत्त संस्था, कृषि विद्यापीठे, बिगर कृषी विद्यापीठे अनुदानित संस्थांमधील शिक्षकेतर कर्मचारी यांना सातव्या वेतन आयोगाच्या कालावधीत केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांना लागू केलेल्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती (Modified Assured Career Progression Scheme) योजनेमध्ये खालीलप्रमाणे आवश्यक तो फेरफार करुन योजनेच्या पूर्वीच्या अटी व शर्तीसह, ही योजना पुढीलप्रमाणे कार्यान्वित करण्यात यावी, अशी शिफारस समिती करीत आहे.

**५.४.१.** सहाव्या वेतन आयोगानुसार रु.५४०० ग्रेड पे पर्यंत च्या मॅट्रीक्समध्ये वेतन आहारीत करणाऱ्या राज्य शासकीय कर्मचारी / अधिकारी यांना त्यांच्या संपूर्ण सेवा कालावधीत १०, २० व ३० वर्षांच्या नियमित सेवेनंतर एकूण ३ लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना, लागू करण्यात यावी.

**५.४.२.** ज्या कर्मचारी / अधिकारी यांना तीन किंवा तीनपेक्षा अधिक कार्यात्मक पदोन्नत्या मिळाल्या आहेत, अशा कर्मचारी / अधिकारी यांना या योजनेअंतर्गत लाभ अनुज्ञेय राहणार नाही. मात्र ज्या अधिकारी / कर्मचारी यांस दोन कार्यात्मक पदोन्नती मिळाल्या आहेत, त्यांना योजनेखाली फक्त एकच लाभ अनुज्ञेय होईल. थोडक्यात संबंधित कर्मचारी / अधिकारी

यांना एकाच पदोन्नती साखळीतील पदावर मिळून त्यांची एकूण नियमित व सलग सेवा ३० वर्ष असल्यास, व या ३० वर्षाच्या कालावधीत झालेल्या कार्यात्मक पदोन्नती व लाभ यांची संख्या, किमान तीन असावी.

**५.४.३.** या योजनेअंतर्गत एकाच पदोन्नती साखळीतील पदांवर मिळून झालेल्या संपूर्ण सेवा कालावधीत संबंधितास सुरुवातीस लाभ मंजूर झाला असल्यास व तदनंतर लाभाच्या वेतनश्रेणीत त्याची कार्यात्मक पदोन्नती झाल्यास, पुन्हा वेतननिश्चितीचा लाभ अनुज्ञेय नसल्याने, अशा पदोन्नतीची गणना त्याच्या एकूण ३ कार्यात्मक पदोन्नतीमध्ये करण्यात येणार नाही.

**५.४.४.** ज्या कर्मचारी / अधिकारी यांना ही योजना लागू होण्यापूर्वी पहिला लाभ हा १२ वर्षाच्या नियमित व सलग सेवा कालावधीनंतर मंजूर झाला आहे, अशा कर्मचारी / अधिकारी यांस पहिल्या लाभाच्या तारखेपासून ८ वर्षाच्या सलग सेवेनंतर दुसरा लाभ हा सातव्या वेतन आयोगाच्या पे मॅट्रीक्स नुसार, तथापि स्वतंत्रपणे निर्गमित होणाऱ्या वेतननिश्चितीसंदर्भातील आदेशानुसार अनुज्ञेय राहील.

ज्या कर्मचारी / अधिकारी यांना ही योजना लागू होण्यापूर्वी दुसरा लाभ हा १२ वर्षाच्या नियमित व सलग सेवा कालावधीनंतर मंजूर झाला आहे, अशा कर्मचारी / अधिकारी यांस दुसऱ्या लाभाच्या तारखेपासून ६ वर्षाची सलग सेवा पूर्ण झाल्यानंतर (३० वर्षाच्या सलग सेवेनंतर) तिसरा लाभ हा सातव्या वेतन आयोगाच्या पे मॅट्रीक्स नुसार, तथापि स्वतंत्रपणे निर्गमित होणाऱ्या वेतननिश्चितीसंदर्भातील आदेशानुसार अनुज्ञेय राहील. मात्र, अशा कर्मचारी / अधिकारी यांच्या सलग ३० वर्षाच्या सेवा कालावधीतील कार्यात्मक पदोन्नती व लाभ यांची संख्या किमान ३ असावी.

दिनांक ०१.०१.२०१६ ते सातव्या वेतन आयोगानुसार सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय करणेबाबतचे आदेश निर्गमित होण्याच्या तारखेपर्यंत ज्यांना, शासन निर्णय वित्त विभाग दिनांक ०१.०४.२०१०, दि.०५.०७.२०१० नुसार, यथास्थिती पहिला व दुसरा लाभ मंजूर केला आहे, त्याबाबतचे आदेश रद्द करुन, सर्व संबंधितांस, सातव्या वेतन आयोगाच्या पे मॅट्रीक्सनुसार, पदोन्नतीच्या पदाच्या सातव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीत, सदर लाभ सुधारीतरीत्या मंजूर करण्यात येतील. त्या अनुषंगाने असुधारीत लाभाची रक्कम, सुधारीत लाभाच्या रकमेशी समायोजित करुन फरकाची रक्कम संबंधितांना अनुज्ञेय करण्यात येईल.

दि.०१.०१.२०१९ नंतर शासन सेवेत प्रवेश करणाऱ्या राज्य शासकीय कर्मचारी व अधिकारी यांना त्यांच्या नियमित सेवेची यथास्थिती १०, २० व ३० वर्षे पूर्ण झाल्यानंतर, पात्रतेनुसार त्यांना, सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला, दुसरा व तिसरा लाभ, हे, पे मॅट्रीक्समधील नेक्स्ट लेव्हलमध्ये (सोबत जोडलेल्या परिशिष्टात दर्शविल्यानुसार), अनुज्ञेय राहील. त्यांच्या देखील सलग ३० वर्षाच्या नियमित सेवा कालावधीतील कार्यात्मक पदोन्नती व लाभ यांची संख्या किमान ३ इतकी राहील.

**५.४.५.** कार्यात्मक पदोन्नती नाकारली आहे अथवा कार्यात्मक पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचारी / अधिकारी हा भविष्यात होणाऱ्या / झालेल्या विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीत कार्यात्मक पदोन्नतीस पात्र ठरल्यास, त्यास कार्यात्मक पदोन्नतीचा कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून १० वर्षाच्या नियमित सेवेनंतर, अन्य विहीत अटी व शर्तीच्या पूर्ततेनंतर या योजनेअंतर्गत अनुज्ञेय ठरत असलेला पहिला / दुसरा / तिसरा लाभ मंजूर करण्यात येईल.

**५.४.६.** एकाकी पद - म्हणजे त्या कार्यालय प्रमुखाच्या / विभाग प्रमुखाच्या कार्यालयास / मंत्रालयीन प्रशासकीय विभागास मंजूर केलेल्या आकृतिबंधामध्ये अंतर्भूत असलेले विशिष्ट संवर्गाचे एकमेव पद, ज्या पदास पदोन्नतीच्या साखळीमध्ये, आकृतिबंधानुसार, पदोन्नतीचे पद मंजूर केलेले नाही.

एकाकी संवर्ग - म्हणजे त्या कार्यालय प्रमुखाच्या / विभाग प्रमुखाच्या कार्यालयास / मंत्रालयीन प्रशासकीय विभागास मंजूर केलेल्या आकृतिबंधामध्ये अंतर्भूत असलेली विशिष्ट संवर्गाची पदे, ज्या पदांना पदोन्नतीच्या साखळीमध्ये, आकृतिबंधानुसार, पदोन्नतीचे पद मंजूर केलेले नाही.

**५.४.७.** या योजनेअंतर्गत लाभ अनुज्ञेयतेसाठी गोपनीय अहवाल प्रतवारीचा निकष हा ब+ असा राहील. तथापि वर्ग-४ मधील कर्मचारी तसेच मागासवर्गीय कर्मचारी यांच्या पदोन्नतीकरीता सामान्य प्रशासन विभागाने विहीत केलेले आदेश तसेच धोरण विचारात घेऊन त्यांची या योजनेअंतर्गत लाभासाठी पात्रता तपासण्यात येईल.

### ५.५. सुधारित सेवा अंतर्गत आश्वासित प्रगती योजना

६ व्या वेतन आयोगामध्ये राज्य शासकीय कर्मचारी/ अधिकारी यांना संपूर्ण कालावधीत २ लाभांची सुधारित सेवा अंतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्यात आलेली आहे. या योजनेचा कार्यकाळ दि.१.१०.२००६ पासून सुरु झालेला आहे. आता, ७

व्या वेतन आयोगामध्ये, केंद्र शासनाच्या धर्तीवर १०, २० व ३० वर्षाच्या नियमित सेवेनंतर अनुज्ञेय ठरणारी तीन लाभांची सुधारित सेवा अंतर्गत आश्वासित प्रगती योजना स्विकारण्याची समितीची शिफारस आहे. ही नविन योजना दि.१.१.२०१६ पासून अंमलात येईल.

**५.५.१.** उपरोक्त योजना पुढील प्रमाणे तीन प्रकारामध्ये मोडणाऱ्या अधिकारी/ कर्मचारी मध्ये विभाजित होईल.

अ. दि.१.१.२०१६ ते दि.३१.१२.२०१८ पर्यंतच्या कालवधीत यथास्थिती पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या लाभासाठी पात्र ठरणारे अधिकारी/ कर्मचारी .

ब. दि.१.१.२०१९ पूर्वी शासन सेवेत नियुक्त झालेले व सुधारित सेवा अंतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या यथास्थिती पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या लाभास दि.१.१.२०१९ नंतर पात्र ठरणारे, अधिकारी/ कर्मचारी

क. दि.१.१.२०१९ नंतर शासन सेवेत प्रवेश करुन १०,२० व ३० वर्षाच्या नियमित सेवेनंतर यथास्थिती पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या लाभास पात्र ठरणारे अधिकारी/ कर्मचारी.

**५.५.२.** पदोन्नतीच्या साखळीतील पदावर अथवा एकाकी पदावर कार्यरत ज्या अधिकारी/ कर्मचारी यांनी दि.१.१.२०१६ पूर्वी यथास्थिती पहिला व दुसरा लाभ घेतला असेल त्यांना पुढील प्रमाणे उर्वरित लाभ अनुज्ञेय ठरतील.

| दि.१.१.२०१६ पूर्वी १२ वा २४ वर्षाच्या सेवेनंतर घेतलेला लाभ | दुसऱ्या लाभाची अनुज्ञेयता | तिसऱ्या लाभाची अनुज्ञेयता |
|---|---|---|
| पहिला लाभ | पहिल्या लाभापासून आठ वर्षानंतर (१२+८) | दुसऱ्या लाभापासून दहा वर्षानंतर (२०+१०) |
| दुसरा लाभ | लागू नाही. | दुसऱ्या लाभापासून सहा वर्षानंतर (२४+६) |

**५.५.३. पदोन्नतीची साखळी असलेल्या पदावर कार्यरत कर्मचारी / अधिकारी यांना दि.१.१.२०१६ ते दि.३१.१२.२०१८ पर्यंतच्या कालावधीत लाभ अनुज्ञेय झाल्यास त्यांना सदर लाभ पुढीलप्रमाणे मंजूर होईल :-**

वेतन मॅट्रीक्समधील वेतन स्तर एस-२० पर्यंतच्या कमाल वेतन मर्यादेपर्यंत वेतन आहरीत करणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांना या नवीन योजने अंतर्गत ७ व्या वेतन आयोगाच्या वेतन मॅट्रीक्समध्ये पदोन्नतीच्या पदाच्या वेतनश्रेणीत यथास्थिती पहिला वा दुसरा वा तिसरा लाभ अनुज्ञेय राहील. याचाच अर्थ संबंधित अधिकारी / कर्मचारी यांना पे मॅट्रीक्समधील वेतन स्तर एस-२० मध्ये वेतन आहरित करेपर्यंतचा, यथास्थिती पहिला वा दुसरा वा तिसरा लाभ अनुज्ञेय ठरेल. पहिला वा दुसरा वा तिसरा लाभ घेतल्यामुळे संबंधित अधिकारी / कर्मचारी यांनी वेतनस्तर एस-२० ओलांडला कि, त्यास तदनंतर त्यापुढील लाभ अनुज्ञेय राहणार नाही / नाहीत.

**५.५.४. एकाकी पदावरील कर्मचारी / अधिकारी यांना दि.१.१.२०१६ ते दि.३१.१२.२०१८ पर्यंतच्या कालावधीत लाभ अनुज्ञेय झाल्यास, सदर लाभ त्यांना पुढीलप्रमाणे मंजूर होईल_:-**

या प्रकारामध्ये येणाऱ्या अधिकारी/ कर्मचारी यांना या नवीन योजने अंतर्गत त्यांची पे मॅट्रीक्समधील लेव्हल विचारात घेवून नजिकच्या लेव्हलमध्ये वेतननिश्चितीचा लाभ, हा पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या लाभ मंजूरीच्या अनुषंगाने अनुज्ञेय राहील. ( सोबत जोडलेल्या परिशिष्टामध्ये दर्शविल्यानुसार )

**५.५.५. मंत्रालयातील लिपिक टंकलेखक या संवर्गातील पदावर, नियुक्त झालेल्या / होणाऱ्या कर्मचाऱ्यांना नवीन योजनेच्या लाभाची अनुज्ञेयता :-**

समितीने मंत्रालयातील लिपिक टंकलेखक संवर्गासाठी वरची वेतनश्रेणी देण्यात यावी अशी शिफारस प्रकरण ४ च्या परिच्छेद ४.७ मध्ये केली आहे. या संवर्गातील लिपिक टंकलेखक कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ कसा द्यावा हा मुद्दा समितीसमोर होता. समितीने या मुद्यावर साकल्याने विचार करुन, मंत्रालयातील लिपिक टंकलेखक संवर्गासाठी पहिली १० वर्षे संपल्यानंतर त्यांच्या विद्यमान वेतनश्रेणीच्या वरची वेतनश्रेणी (Next Level), आणि २० वर्षे संपल्यानंतर त्याच्या लगतची वरची वेतनश्रेणी (next to next level) तसेच ३० वर्षे संपल्यानंतर त्याच्या लगतची वरची वेतनश्रेणी (next to next to next level) देण्यात यावी अशी शिफारस समिती करीत आहे.

**५.५.६. अगोदरच शासन सेवेत कार्यरत असताना दि.१.१.२०१९ नंतर लाभ अनुज्ञेय ठरणाऱ्या, पदोन्नतीच्या साखळीतील पदावर कार्यरत कर्मचारी / अधिकारी यांना दि.१.१.२०१९ रोजी व नंतर च्या कालावधीत नवीन योजनेच्या लाभाची अनुज्ञेयता :-**

वेतन मॅट्रीक्समधील वेतन स्तर एस-२० पर्यंतच्या कमाल वेतन मर्यादेपर्यंत वेतन आहरीत करणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांना या नवीन योजने अंतर्गत ७ व्या वेतन आयोगाच्या वेतन मॅट्रीक्समध्ये पदोन्नतीच्या पदाच्या वेतनश्रेणीत यथास्थिती पहिला वा दुसरा वा तिसरा लाभ अनुज्ञेय राहील. याचाच अर्थ संबंधित अधिकारी / कर्मचारी यांना पे मॅट्रीक्समधील वेतन स्तर एस-२० मध्ये वेतन आहरित करेपर्यंतचा, यथास्थिती पहिला वा दुसरा वा तिसरा लाभ अनुज्ञेय ठरेल. पहिला वा दुसरा वा तिसरा लाभ घेतल्यामुळे संबंधित अधिकारी / कर्मचारी यांनी वेतनस्तर एस-२० ओलांडला कि, त्यास तदनंतर त्यापुढील लाभ अनुज्ञेय राहणार नाही / नाहीत.

**५.५.७. दि.१.१.२०१९ रोजी व नंतर शासन सेवेत पदोन्नतीच्या साखळीतील पदावर अथवा एकाकी पदावर किंवा एकाकी संवर्गावर, सरळसेवा प्रवेशाने नियुक्त होणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांना नवीन योजनेअंतर्गत लाभाची अनुज्ञेयता :-**

या प्रकारामध्ये मोडणाऱ्या अधिकारी/ कर्मचारी यांना पे मॅट्रीक्समधील त्यांची विद्यमान वेतन स्तर विचारात घेऊन नजीकच्या वेतन स्तरामध्ये, (सोबत जोडलेल्या परिशिष्टामध्ये दर्शविल्यानुसार ) पहिला, दुसरा व तिसरा लाभ हा १०, २० व ३० वर्षाच्या नियमित सेवेनंतर अनुज्ञेय ठरेल.

५.५.८ सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योतनेबाबत, सहाव्या वेतन आयोगाच्या कालावधीत विशिष्ट पदांना, त्यांच्या कर्तव्य व जबाबदारीत वाढ न होता मंजूर करण्यात येणाऱ्या उच्च वेतन संरचनेचा अथवा अकार्यात्मक वेतन संरचनेचा लाभ हा, पहिला लाभ समजण्यात येत होता. ती तरतूद तसेच सदर योजनेतील अन्य आवश्यक अटी व शर्ती ह्या या नवीन योजनेत देखील तशाच लागू राहतील.

## अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना (से.आ.प्र.यो.)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | (१) | दि. ०१.०१.२०१९ वा त्यानंतर शासन सेवेत / जिल्हा परिषदेत / अनुदानित संस्थेत रुजू झालेल्या प्रकरणी | | | |
| | (२) | विभागात पदोन्नतीची वेतनश्रेणी नसलेल्या, एकमेव संवर्ग असलेल्या पदावरील प्रकरणी | | | |
| | (३) | विभागात पदोन्नतीची वेतनश्रेणी नसलेल्या, एकमेव पदावरील प्रकरणी | | | |
| | कोणत्या वेतनश्रेणीत नियुक्ती | सेआप्रयो अंतर्गत अनुज्ञेय वेतनश्रेणी | सेआप्रयो अंतर्गत अनुज्ञेय वेतनश्रेणी | सेआप्रयो अंतर्गत अनुज्ञेय वेतनश्रेणी | |
| | सुरुवातीस | नियुक्तीपासून १० वर्षाच्या सेवेनंतर | नियुक्तीपासून २० वर्षाच्या सेवेनंतर किंवा किंवा मागील पदोन्नतीच्या तारखेपासून १० वर्षाच्या सेवेनंतर | नियुक्तीपासून ३० वर्षाच्या सेवेनंतर किंवा किंवा मागील पदोन्नतीच्या तारखेपासून १० वर्षाच्या सेवेनंतर | |
| अ.क्र. | | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | |
| १ | एस-१ | एस -२ | एस -३ | एस -४ | |
| २ | एस -२ | एस -३ | एस -४ | एस -५ | |
| ३ | एस -३ | एस -४ | एस -५ | एस -६ | |
| ४ | एस -४ | एस -५ | एस -६ | एस -७ | |
| ५ | एस -५ | एस -६ | एस -७ | एस -८ | |
| ६ | एस -६ | एस -७ | एस -८ | एस -९ | |
| ७ | एस -७ | एस -८ | एस -९ | एस -१० | |
| ८ | एस -८ | एस -९ | एस -१० | एस -११ | |
| ९ | एस -९ | एस -१० | एस -११ | एस -१२ | |
| १० | एस -१० | एस -११ | एस -१२ | एस -१३ | |
| ११ | एस -११ | एस -१२ | एस -१३ | एस- १४ | |
| १२ | एस -१२ | एस -१३ | एस- १४ | एस- १५ | |
| १३ | एस -१३ | एस- १४ | एस- १५ | एस- १६ | |
| १४ | एस- १४ | एस- १५ | एस- १६ | एस -१७ | |
| १५ | एस- १५ | एस- १६ | एस -१७ | एस -१८ | |
| १६ | एस- १६ | एस -१७ | एस -१८ | एस -१९ | |
| १७ | एस -१७ | एस -१८ | एस -१९ | एस -२० | |
| १८ | एस -१८ | एस -१९ | एस -२० | एस -२१ | |
| १९ | एस -१९ | एस -२० | एस -२१ | **लागू नाही** | |
| २० | एस -२० | एस -२१ | **लागू नाही** | **लागू नाही** | |

******

# प्रकरण- ६ सेवानिवृत्तिवेतन व आनुषंगिक लाभासंदर्भात शिफारशी

## ६.१ सेवानिवृत्तिवेतनात सुधारणा

**६.१.१** सुधारित वेतन संरचनेच्या परिणामस्वरुप सेवानिवृत्तिवेतन तसेच अनुषंगिक लाभासंदर्भात शिफारशी करणे ही समितीच्या कार्यकक्षेतील बाब आहे. त्यामुळे या प्रकरणात नवीन परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना लागू नसलेल्या म्हणजेच महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ लागू असलेल्या कर्मचाऱ्यांचे सुधारित निवृत्तिवेतन व इतर अनुषंगिक लाभांची निश्चिती, यासंदर्भात शिफारशी करण्यात येत आहेत. सेवानिवृत्तिविषयक लाभांच्या सध्याच्या दरानुसार सुमारे ७.०५ लक्ष निवृत्तिवेतनधारकांवर २०१७-१८ मध्ये अंदाजे रुपये १५००० कोटी इतका खर्च झाला. निवृत्तिवेतनधारकांच्या निवृत्तिवेतनात सुधारणा सुचविताना सध्याच्या निवृत्तिवेतनात वाजवी वाढ करण्याची गरज तसेच शासनावर येणाऱ्या वाढीव दायित्व या दोन्ही बाबींचा समितीने साकल्याने विचार केला. दिनांक ०१.०१.२०१६ पूर्वी तसेच दिनांक ०१.०१.२०१६ रोजी किंवा त्यानंतर सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तिवेतनधारकांबाबत स्वतंत्रपणे शिफारशी करण्यात आल्या आहेत. असाधारण निवृत्तिवेतन, दिव्यांगता निवृत्तिवेतन, सानुग्रह अनुदान इत्यादी निवृत्तिवेतनाच्या प्रकारासंदर्भात वेगळ्या तरतुदी असल्यामुळे समितीने यासंदर्भात शिफारशी केल्या नाहीत.

## ६.२ दिनांक ०१.०१.२०१६ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तिवेतनधारकांच्या निवृत्तिवेतनात सुधारणा

**६.२.१** सातव्या केंद्रीय वेतन आयोगाने दिनांक ०१.०१.२०१६ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तिवेतनधारकांच्या मूळ निवृत्तिवेतनाच्या (यामध्ये महागाई भत्त्याचा समावेश नसेल) २.५७ पटीने देण्याची शिफारस केली आहे. त्याप्रमाणे राज्यातील निवृत्तिवेतनधारकांच्या निवृत्तिवेतनात सुधारणा करण्याची शिफारस समिती करीत आहे.

राज्य शासनाने सहाव्या वेतन आयोगानुसार कमीत कमी निवृत्तिवेतन रु. २८८२/- दिलेले असून त्यास २.५७ ने गुणून येणारी रक्कम ७४१०/- येत आहे. केंद्राने सातव्या वेतन आयोगात कमीत कमी निवृत्तिवेतन रु. ९०००/- इतके केलेले असल्याने कमीत कमी निवृत्तिवेतन रु.७५००/- करण्याची समिती शिफारस करीत आहे. दिनांक ०१.०१.२०१६ पूर्वीच्या सेवानिवृत्तिवेतनधारकांना अनुज्ञेय होणाऱ्या सुधारित निवृत्तिवेतनाचा शिघ्रगणक तयार करावा म्हणजे सर्व निवृत्तिवेतनधारकांचे निवृत्तिवेतन सुधारित करणे सोयीचे होईल

## ६.३ दिनांक ०१.०१.२०१६ रोजी किंवा त्यानंतर सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तिवेतनधारकांना मिळणारे इतर निवृत्तिवेतन विषयक लाभ

**६.३.१** दिनांक ०१.०१.२०१६ पासून सुधारित वेतन संरचना लागू केल्यामुळे या दिनांकापासून सेवानिवृत्त झालेल्या/ होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या निवृत्तिवेतनात सुध्दा त्याप्रमाणे सुधारणा होणे सहाजिक आहे. अशीच सुधारणा इतर लाभांतही उदा. उपदान, रजा रोखीकरण इत्यादीमध्ये होणे अपेक्षित आहे. या बाबींचा विचार करुन सध्या अनुज्ञेय जास्तीत जास्त रुपये ७ लक्ष उपदानाची कमाल मर्यादा वाढवून रक्कम रुपये १४ लक्ष इतकी करण्याची समिती शिफारस करीत आहे.

### ६.३.२ निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण

निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणासाठी सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या अनुषंगाने व्याज दर आणि आयुर्मानाचा विचार करुन सुधारित अंशराशीकरणाचा तक्ता मंजूर करण्यांत आलेला आहे. या तक्त्याचा वापर सातव्या वेतन आयोगानुसारही अंशराशीकरणाच्या परिगणनेसाठी करण्याबाबत समिती शिफारस करीत आहे.

उदा. दिनांक ०१.०१.२०१६ नंतर, परंतु सुधारित वेतन संरचना लागू करण्यापूर्वी सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्याचे मासिक मूळ निवृत्तिवेतन रुपये १०००० आहे. त्या मूळ निवृत्तिवेतनाच्या ४०% रक्कमेचे (म्हणजे रुपये ४०००) अंशराशीकरण केले होते. नियत वयोमान पूर्ण झाल्यानंतर (५८ वर्षे गृहीत धरुन) सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत विद्यमान अंशराशीकरणाच्या तक्त्यानुसार पुढील जन्मदिनी होणारे वय (५९ वर्षे गृहीत धरुन) लक्षात घेऊन अंशराशीकरणाचे मुल्य (प्रतीवर्षी १ रुपया निवृत्तिवेतनाकरीता) ८.३७१ आहे. या आधारे त्यांच्या मासिक रुपये ४००० म्हणजेच वार्षिक रुपये ४८००० साठी अंशराशीकरणाची रक्कम रुपये ४८००० X ८.३७१= ४०१८०८ इतकी होते. संबंधित कर्मचारी दिनांक ०१.०१.२०१६ नंतर सेवानिवृत्त झाला असल्यामुळे त्याची सुधारित वेतन संरचनेत दिनांक ०१.०१.२०१६ रोजी वेतननिश्चिती होईल व त्याआधारे मूळ निवृत्तिवेतनातसुध्दा सुधारणा होईल. समजा सुधारित मूळ निवृत्तिवेतन रुपये १०००० ऐवजी रुपये १५००० इतके झाले तर या प्रकरणी दोन पर्याय उपलब्ध आहेत.

(१) नवीन अंशराशीकरण न करता, प्रत्येक महिन्यात रुपये ११००० (म्हणजे सुधारित मूळ निवृत्तिवेतन रुपये १५००० वजा यापूर्वी अंशराशीकरण केलेली रक्कम रुपये ४०००) एवढे निवृत्तिवेतन घेणे.

(२) वाढीव मूळ निवृत्तिवेतन (म्हणजे सुधारित मूळ निवृत्तिवेतन वजा पूर्वीचे मूळ निवृत्तिवेतन) रुपये ५००० चे पुन्हा ४०% अंशराशीकरण करणे. याचा अर्थ प्रतिमाह रुपये २००० किंवा वार्षिक रुपये २४००० इतक्या रकमेचे पुन्हा अंशराशीकरण करणे. समजा तसे करण्याच्यावेळी त्याने वयाची ५९ वर्षे (अंदाजित) पूर्ण केली असल्यास, त्याचे पुढील जन्मदिनी होणारे वय ६० असल्यामुळे नवीन अंशराशीकरणाच्या तक्त्यानुसार वार्षिक रुपया एक करिता अंशराशीकरण मूल्य ८.२८७ इतके आहे. म्हणून त्याला २४००० X ८.२८७= १९८८८८ इतकी अंशराशीकरणाची वाढीव रक्कम मिळेल.

येथे असेही स्पष्ट करण्यात येते की, नविन सुधारित निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणाची रक्कम सातवा वेतन आयोग लागू केल्यानंतर अदा करण्यात आली असल्यामुळे त्या अनुषंगाने तत्पूर्वीची त्यांच्याकडून कोणत्याही रकमेची वसूली करता येणार नाही. पुन्हा अंशराशीकरण केल्यानंतर त्याला प्रत्येक महिन्यात रुपये ९००० (म्हणजेच सुधारित मूळ निवृत्तिवेतन रुपये १५००० वजा एकूण अंशराशीकरण केलेले रुपये ४०००+२०००= ६०००) इतके मासिक निवृत्तिवेतन मिळणार आहे. तसेच असेही स्पष्ट करण्यात येते की, त्याच्या सेवानिवृत्तिच्या दिनांकापासून दुसरे अंशराशीकरण करण्यापर्यंत त्याला रुपये ११००० (म्हणजे सुधारीत मूळ निवृत्तिवेतन रुपये १५००० वजा पूर्वी अंशराशीकरण केलेले रुपये ४०००) मासिक निवृत्तिवेतन याप्रमाणे थकबाकी मिळेल.

## ६.४ सुधारित वेतन संरचना लागू केल्यामुळे परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजनेतील शासकीय अंशदानात वाढ

**६.४.१** दिनांक ०१.११.२००५ पासून नव्याने सेवेत दाखल झालेल्या उमेदवारांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना लागू करण्यात आली आहे. ही योजना लागू असलेल्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या मूळ वेतनाच्या कमीत कमी १० टक्के मासिक अंशदान द्यावे लागते. तसेच १० टक्के अंशदान शासनामार्फत देण्यात येते. सुधारित वेतन संरचनेमुळे कर्मचाऱ्यांच्या वेतनात लक्षणीय वाढ होणार असल्यामुळे या योजनेखाली देण्यात येणाऱ्या शासकीय अंशदानाच्या रक्कमेतही दिनांक ०१.०१.२०१६ पासून भरीव वाढ होईल.

## ६.५ कमीत कमी निवृत्तिवेतन

केंद्र सरकारच्या सहाव्या वेतन आयोगानुसार असलेले कमीत कमी निवृत्तिवेतनाचे दर रु.३५००/- दरमहा आहेत. केंद्र सरकारच्या सातव्या वेतन आयोगानुसार कमीत कमी वेतन

रु.१८०००/- इतके वाढणार आहे. या परिगणनेनुसार कमीत कमी निवृत्तिवेतन रु.९०००/- होणार आहे. त्यामुळे केंद्रीय सातव्या वेतन आयोगाने कमीत कमी निवृत्तिवेतनाचे दर न वाढविण्याची शिफारस केली आहे.

राज्य शासनाने सहाव्या वेतन आयोगानुसार कमीत कमी निवृत्तिवेतन रु.२८८२/- ठरविले असून त्यास २.५७ ने गुणून येणारी रक्कम ७४१०/- येत आहे. केंद्राने सातव्या वेतन आयोगात कमीत कमी निवृत्तिवेतन रु. ९०००/- इतके केलेले असल्याने कमीत कमी निवृत्तिवेतन रु. ७५००/- करण्याची समिती शिफारस करीत आहे.

## ६.६ सेवेत असताना मृत्यू पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसास कुटुंब निवृत्तिवेतन

**६.६.१** सेवेत असताना मृत्यू पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसाच्या कुटुंब निवृत्तिवेतनाबाबत सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार १० वर्षांपर्यंत उच्च दराने कुटुंब निवृत्तिवेतन अदा करण्यात येते. ही मर्यादा न वाढविण्याची शिफारस केंद्रीय वेतन आयोगाने केलेली असल्यामुळे केंद्र शासनाने ही शिफारस स्वीकारलेली आहे.

राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीतही सेवेत असताना मृत्यू पावलेल्या कर्मचाऱ्याच्या वारसास १० वर्षांपर्यंत उच्च दराने कुटुंब निवृत्तिवेतन अदा करण्यात येते. राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या कुटुंब निवृत्तिवेतनाकरीता सध्या अस्तित्वात असलेली तरतूद सातव्या वेतन आयोगातही कायम ठेवण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**६.६.२** शासकीय कर्मचाऱ्याचा सेवानिवृत्ती नंतर मृत्यू झाल्यास मृत्यू पावलेल्या कर्मचाऱ्याच्या वारसाच्या कुटुंब निवृत्तिवेतनाबाबत सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार अस्तित्वात असलेल्या तरतूदी या सातव्या वेतन आयोगातही यापुढे तशाच ठेवण्यात याव्यात अशी शिफारस आहे.

## ६.७ अतिवृध्द निवृत्तिवेतन/ कुटुंब निवृत्तिवेतनधारकांना निवृत्तिवेतनात वाढ

केंद्र सरकारच्या सहाव्या वेतन आयोगानुसार अतिवृध्द निवृत्तिवेतनधारकांना अतिरिक्त निवृत्तिवेतन व कुटुंब निवृत्तिवेतन यांचे दर खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत. केंद्रीय सातव्या वेतन आयोगाच्या समितीने या दरांमध्ये कोणतीही सुधारणा प्रस्तावित केलेली नाही.

| | |
|---|---|
| वय वर्षे ८० ते ८५ | २०% अतिरिक्त निवृत्तिवेतन |
| वय वर्षे ८५ ते ९० | ३०% अतिरिक्त निवृत्तिवेतन |
| वय वर्षे ९० ते ९५ | ४०% अतिरिक्त निवृत्तिवेतन |

| | |
|---|---|
| वय वर्षे ९५ ते १०० | ५०% अतिरिक्त निवृत्तिवेतन |
| वय वर्षे १०० व त्यावरील | १००% अतिरिक्त निवृत्तिवेतन |

सहाव्या वेतन सुधारणा समितीच्या शिफारशीनुसार राज्य शासनाने त्यांच्या वय वर्षे ८० च्या वरील सर्व अतिवृध्द निवृत्तिवेतनधारकांकरिता सरसकट १०% निवृत्तिवेतनात वाढ यापूर्वीच केलेली आहे. सातव्या वेतन आयोगानुसार सदर दरांमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा समिती प्रस्तावित करीत आहे.

| | |
|---|---|
| वय वर्षे ८० ते ८५ | मुळ निवृत्ती वेतनात १०% वाढ |
| वय वर्षे ८५ ते ९० | मुळ निवृत्ती वेतनात १५% वाढ |
| वय वर्षे ९० ते ९५ | मुळ निवृत्ती वेतनात २०% वाढ |
| वय वर्षे ९५ ते १०० | मुळ निवृत्ती वेतनात २५% वाढ |
| वय वर्षे १०० व त्यावरील | मुळ निवृत्ती वेतनात ५०% वाढ |

सदर वाढ ही दिनांक ०१.०१.२०१६ पासून लागू करण्याची समिती शिफारस करीत आहे.

## ६.८ मृत्यु-नि-सेवा उपदानाच्या मर्यादेत वाढ

### ६.८.१ सेवा उपदान

केंद्र सरकारच्या सातव्या वेतन आयोगानुसार शासकीय कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर देय असलेल्या सेवा-नि-उपदानाची मर्यादा रु.१० लाखावरुन रु.२० लाख इतकी वाढविण्याची शिफारस करण्यात आलेली आहे. केंद्र सरकारने सदर शिफारस स्विकारली आहे.

राज्य शासकीय कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर देय असलेल्या सेवा-नि-उपदानाची मर्यादा सहाव्या वेतन सुधारणा समितीनुसार रु.७ लाख इतकी असून सातव्या वेतन आयोगानुसार सेवा-नि-उपदानाची मर्यादा दिनांक ०१.०१.२०१६ पासून रु.१४ लाख इतकी करण्याची समिती शिफारस करीत आहे.

### ६.८.२ मृत्यु-नि-सेवा उपदान

केंद्र सरकारच्या सातव्या वेतन आयोगानुसार, शासकीय कर्मचाऱ्याचे सेवेत असताना निधन झाल्यास, त्याच्या कुटूंबाला देय असलेल्या मृत्यु-नि-सेवा-उपदान च्या दरांमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्याची शिफारस करण्यात आलेली आहे. केंद्रीय सातव्या वेतन आयोग समितीने सदर शिफारस स्विकारली आहे.

| **सेवेचा कालावधी** | **मृत्यू उपदानाचा दर** |
|---|---|
| सेवा १ वर्षे पेक्षा कमी | अंतिम वेतनाच्या दुप्पट |
| सेवा १ वर्षे पेक्षा जास्त व ५ वर्षापेक्षा कमी | अंतिम वेतनाच्या सहापट |
| सेवा ५ वर्षे पेक्षा जास्त व ११ वर्षापेक्षा कमी | अंतिम वेतनाच्या १२ पट |
| सेवा ११ वर्षे पेक्षा जास्त व २० वर्षापेक्षा कमी | अंतिम वेतनाच्या २० पट |
| सेवा २० वर्षपेक्षा जास्त | अर्हताकारी सेवेच्या पूर्ण केलेल्या प्रत्येक सहामाही कालावधीसाठी वेतनाच्या निम्मे मात्र वेतनाच्या ३३ पटीच्या कमाल मर्यादेत. |

राज्य शासनाच्या शासकीय कर्मचाऱ्याचे सेवेत असताना निधन झाल्यास त्याच्या कुटूंबाला देय असलेल्या मृत्यु-नि-सेवा-उपदानाच्या दरांमध्ये केंद्र सरकारच्या सातव्या वेतन आयोगानुसार केलेल्या बदलाप्रमाणे खालीलप्रमाणे वाढ प्रस्तावित करण्यात येत आहे.

| **सेवेचा कालावधी** | **मृत्यू उपदानाचा दर** |
|---|---|
| सेवा १ वर्षापर्यंत | अंतिम वेतनाच्या दुप्पट |
| सेवा १ वर्षापेक्षा जास्त व ५ वर्षापर्यंत | अंतिम वेतनाच्या सहापट |
| सेवा ५ वर्षापेक्षा जास्त व ११ वर्षापर्यंत | अंतिम वेतनाच्या १२ पट |
| सेवा ११ वर्षापेक्षा जास्त व २० वर्षापर्यंत | अंतिम वेतनाच्या २० पट |
| सेवा २० वर्षापेक्षा जास्त | अर्हताकारी सेवेच्या पूर्ण केलेल्या प्रत्येक सहामाही कालावधीसाठी वेतनाच्या निम्मे मात्र वेतनाच्या ३३ पटीच्या मर्यादेत कमाल १४ लाखांच्या मर्यादेत. |

## ६.९ निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण

केंद्र सरकारच्या सातव्या वेतन आयोगानुसार निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण हे निवृत्तिवेतनाच्या जास्तीत जास्त ४०% यापेक्षा न वाढविण्याचा व अंशराशीकरण रकमेच्या कपातीचा अवधी (१५ वर्षे) कमी न करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

राज्य शासनाच्या निवृत्तिवेतनधारकांकरीताही सहाव्या वेतन आयोगात निवृत्तिवेतनाच्या जास्तीत जास्त ४०% इतके निवृत्तिवेतन अंशराशीकरण करणे व अंशराशीकरण रकमेच्या कपातीचा अवधी (१५ वर्षे) इतकाच आहे. त्याच धर्तीवर सातव्या वेतन आयोगात राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीतही निवृत्तिवेतनाच्या

अंशराशीकरणासाठी सध्या अस्तित्वात असलेली तरतूदी यापुढेही कायम ठेवण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**६.१०** उपरोक्त सर्व लाभ निवृत्तिवेतनधारक / कुटुंबनिवृत्तिवेतनधारकांना दिनांक ०१.०१.२०१६ पासून लागू राहतील.

राज्य शासनाच्या सातव्या वेतन आयोगानुसार नमूद सर्व सुधारणा राज्य शासकीय कुटुंब निवृत्तिवेतनधारकांनाही योग्य त्या फेरफारासह लागू करण्याची समिती शिफारस करीत आहे.

*****

# प्रकरण ७ - समितीच्या शिफारशींमुळे अपेक्षित आर्थिक भार

**७.१.** केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारसी विचारात घेऊन राज्य शासकीय व अन्य पात्र कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेण्या व निवृत्तिवेतन दिनांक १.१.२०१६ पासून लागू करण्यात यावे, अशी समिती शिफारस करीत आहे. समितीने केलेल्या वेगवेगळ्या शिफारशींच्या अनुषंगाने येणारा संभाव्य आर्थिक भार निश्चित करण्याकरीता कर्मचाऱ्यांची संख्या, वेतनावरील खर्च, निवृतिवेतनधारकांची संख्या, निवृत्तिवेतनावरील खर्च व वेतनाच्या अन्य बाबींवरील खर्चाची माहिती समितीला सहाय्य करण्यासाठी नियुक्त केलेल्या मे. के पी एम जी या सल्लागार संस्थेस मिळावी, यासाठी संचालक लेखा कोषागारे, संचालक माहिती व तंत्रज्ञान यांच्याशी वेळोवेळी पत्र व्यवहार करण्यात आला होता, तसेच बैठकाही आयोजित करण्यात आल्या होत्या. समितीला आवश्यक असलेली माहिती विद्यमान व्यवस्थेतील यंत्रणाकडून एकत्रितरित्या उपलब्ध होण्यात अनेक अडचणी असल्याची बाब समितीच्या सातत्याने निदर्शनास आली आहे. या बाबत करावयाच्या उपाययोजनांसंदर्भातील समितीचे अभिप्राय स्वतंत्रपणे अहवालाच्या खंड २ मध्ये नमूद करण्यात येत आहे.

संचालक लेखा कोषागारे, महाआयटी आणि शालेय शिक्षण विभाग यांच्याकडून उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे दिनांक १.१.२०१६ पासून वेतन व निवृत्तिवेतन सुधारित केल्यामुळे दिनांक १.१.२०१६ ते दिनांक ३१.१२.२०१८ या कालावधीतील थकबाकीची अंदाजित परिगणना खालीलप्रमाणे करण्यात आली आहे:-

| अ.क्र. | तपशील | अंदाजित खर्च (रू. कोटी) |
|---|---|---|
| १. | दिनांक १.१.२०१६ पासून २.५७ या वेतननिश्चितीच्या सुत्रानुसार सुधारित दराने वेतन | १७२७० |
| २. | सुधारित वेतन मॅट्रिक्समध्ये वेतन स्तर विहित करताना काही असुधारित वेतन संरचनांचे विलिनीकरण केल्यामुळे | ५८० |
| ३. | अंशकालीन कर्मचाऱ्यांच्या नियत/एकत्रित वेतनात सुधारणा केल्यामुळे | १८ |
| ४. | मंत्रालयीन लिपिक-टंकलेखक संवर्गाच्या सुधारित वेतन वेतन स्तरामुळे | ५ |

| | | |
|---|---|---|
| ५. | दिनांक १.१.२०१६ पासून २.५७ या निवृत्तिवेतन वेतननिश्चितीच्या सुत्रानुसार सुधारित दराने निवृत्तिवेतन | ९५९० |
| ६. | निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण | ४१६५ |
| ७. | सेवा उपदानाच्या दरातील सुधारणेमुळे | ३५८० |
| ८. | अतिवृध्द निवृत्तिवेतन / कुटुंब निवृत्तिवेतनधारकांच्या निवृत्तिवेतनात वाढ | ८५० |
| ९ | सुधारित दराने वेतनामुळे परिभाषीत अंशदायी निवृत्तिवेतन योजना /राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेतील द्यावा लागणारा शासनाचा वाढीव हिस्सा | ३४५० |
| | एकूण | ३९५१० |

दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून दिनांक ३१ डिसेंबर, २०१८ या कालावधीसाठी वेतन व निवृत्तिवेतन सुधारित केल्यामुळे थकबाकीची रक्कम समान हप्त्यात अदा करण्यात यावी. निवृत्तिवेतनधारकांना अनुज्ञेय असणारी थकबाकीची रक्कम कमीत कमी हप्त्यात अदा करण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.

*********